अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## श्रीलंकेविरुद्ध सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा
## हार्दिक पंड्याकडे टी २० संघाचं कर्णधारपद



**मुंबई** : भारतीय संघ २०२३ वर्षांची सुरुवात श्रीलंकेविरुद्ध सामन्यांनी करणार आहे. जानेवारी २०२३ मध्ये श्रीलंकेविरुद्ध भारत टी२० आणि एकदिवसीय मालिका खेळणार आहे. या सामन्यांसाठी बीसीसीआयनं नुकताच संघ जाहीर केला आहे.

यावेळी टी२० संघाचं कर्णधारपद हार्दिक पांड्या याच्याकडे दिलं गेलं असून एकदिवसीय संघाची धुरा रोहित शर्मा याच्याकडेच आहे. विशेष म्हणजे सूर्यकुमार यादव याला टी२० संघाचा उपकर्णदार केलं असून बऱ्याच युवा खेळाडूंना टी२० संघात संधी दिली गेली आहे. याशिवाय रोहितसह विराट, श्रेयस अय्यर, केएल राहुल हे दिग्गज टी२० संघात नसून एकदिवसीय संघात आहेत.

**भारताचा टी २० संघ** : हार्दिक पांड्या (कर्णधार), सूर्यकुमार यादव (उपकर्णधार), ईशान किशन (विकेटकिपर), ऋतुराज गायकवाड, शुभमन दिल, दीपक हुडा, राहुल त्रिपाठी, संजू सॅमसन, वॉशिंगटन सुंदर, युजवेंद्र चहल, अक्षर पटेल, अर्शदीप सिंह, हर्षल पटेल, उमरान मलिक, शिवम मावी, मुकेश कुमार

**भारताचा एकदिवसीय संघ**
रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पांड्या (उप कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, केएल राहुल (विकेटकिपर), ईशान किशन (विकेटकिपर), वॉशिंगटन सुंदर, युजवेंद्र चहल, कुलदीप यादव, अक्षर पटेल, मोहम्मद शामी, मोहम्मद सिराज, उमरान मलिक, अर्शदीप सिंह

www.surajyadigital.com बुधवार दि. २८ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ९२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# उत्तुंग आमुची कर्नाटक सीमा इंच इंच वाढवू, खंबीरपणाने, ताकदीनिशी न्यायालयीन लढा लढवू

## • कर्नाटकाला जशास तसे उत्तर देण्यासाठी महाराष्ट्राचा ठराव

सुराज्य/नागपूर

*" उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू अभिमान धरू, बलिदान करू, ध्वज उंच उंच चढवू "*

**या आहेत कवी वसंत बापट यांच्या देशभक्तिपर गीतातील पहिल्या दोन ओळी. या ओळींमध्ये जो अर्थ वसंत बापटांना अभिप्रेत आहे; त्यास साजेसा असा ठराव महाराष्ट्राच्या विधिमंडळाने महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत मंगळवारी एकमताने मंजूर केला.'उत्तुंग आमुची कर्नाटक सीमा इंच इंच वाढवू, खंबीरपणाने, ताकदीनिशी न्यायालयीन लढा लढवू' अशा अर्थाने 'बेळगाव, निपाणी, कारवारसह तब्बल ८६५ मराठी भाषिक गावातील इंच इंच जमीन तेथील नागरिकांसह महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी भक्कमपणे कायदेशीर लढा सर्वोच्च न्यायालयात लढवू' असा निर्धार करणारा ठराव मंजूर करण्यात आला.**

कर्नाटक शासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तींचा तीव्र शब्दांत निषेध करणारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलेला ठराव मंगळवारी महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आला. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर या शहरांसह ८६५ गावातील मराठी भाषक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे. सीमा भागातील इंच न् इंच जमीन तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्याचा आणि सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्यासाठी कर्नाटक सरकारला समज देण्यात यावी, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन्ही सभागृहात मांडलेल्या ठरावात म्हटले आहे. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांनी बाके वाजवत एकमताने ठराव संमत केला.




### अन्यायाचा वाचला पाढा

सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्षे होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांच्यावर केले जाणारे अत्याचार, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर समन्वयक मंत्री सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आत्तापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करून त्यांचे भूखंड कन्नड भाषिकांना वितरित करणे तसेच अल्पसंख्य आयोगाने व उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपूर्वक केला जात आहे.

### सीमा भागातील नागरिकांसाठी घोषणा

सद्य:स्थितीत कर्नाटकाच्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषिक खेडे घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ट होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्त्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी विविध सोईसुविधा व सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या लाभांबरोबरच अभियांत्रिकी वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी विशेष सवलत, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वप्रशिक्षणासाठी सवलत, सारथी व इतर शासकीय संस्थाच्यामार्फत विहित अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### विरोधी ठरावातील महत्त्वाचे मुद्दे

१. कर्नाटकातील मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.

२. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला सीमावाद हा सनदशीर मार्गाने अत्यंत खंबीरपणे दृढ निश्चयाने व संपूर्ण ताकदीनिशी लढा देण्यात येईल,

३. बेळगाव, कारवार, निपाणी बिदर या शहरांसह ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे.

४. तसेच याबाबत केंद्र शासनाने गृहमंत्री भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा तसेच सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत सरकारला समज देण्यात यावी.

# जुने व्हिडीओ काढून धमकवण्याचा प्रयत्न : प्रा.सुषमा अंधारे

सुराज्य/सोलापूर

१३ वर्षांपूर्वीचे व्हिडिओ काढून मला धमकावण्याचा, बदनाम करण्याचा भाजप प्रयत्न करत आहे. वारकरी वेशभूषा केलेले खोटे धारकरी उभे करत आहेत. हे लोक भागवत संप्रदायातील नसून मोहन भागवत संप्रदायाचे आहेत, असा आरोप शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या प्रा. डॉ. सुषमा अंधारे यांनी केला आहे.

मंगळवारी, हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित महाप्रबोधन यात्रेच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. त्यांनी काही व्हिडिओ उपस्थितांना दाखविले. यामध्ये श्री श्री श्री रविशंकर, इंदोरीकर महाराज, संभाजी भिडे यांनी हिंदू देवदेवतांविषयी केलेली वक्तव्ये होती. यावेळी उपनेत्या संजना घाडी, संपर्कप्रमुख अनिल कोकिळ, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, राज्याचे विस्तारक शरद कोळी, संघटक अस्मिता गायकवाड, जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, शहरप्रमुख विष्णू कारमपुरी, भंवर यांचीही भाषणे झाली. एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, भाजपने तुमचे मांजर केले आहे. महाराष्ट्रातल्या गाड्या कर्नाटकात फोडल्या




जात असताना तुम्ही तोंडातून एक शब्दही काढला नाही. या घटनेला पंधरा दिवस उलटले असताना तुम्ही गप्प होता. कारण भाजपचा तुमच्यावर मोठा दबाव होता. तुमचे प्रतिमाहनन करायचे आणि महाराष्ट्राच्या जनतेतून, जनतेच्या मनातून तुम्हाला उतरवायचे. तुमचे इमेज डॅमेज करायचे हा भाजपचा डाव होता. तो यशस्वी झाला. या घटनेला इतके दिवस झाल्यानंतर आज तुम्ही तोंड उघडले आणि या प्रश्नावर तुम्ही भाष्य केले. भाजपकडून एकनाथ शिंदे यांना पद्धतशीरपणे संपविण्यात येत आहे. एकनाथ शिंदे गटातील चार ते पाच आमदारांची चौकशी लावण्यात आली आहे. शंभूराजे देसाई, अब्दुल सत्तार, संजय राठोड, राहुल शेवाळे अशा अनेक नेत्यांच्या मागे चौकशी लावून त्यांचे राजकीय करिअर उद्धवस्त करण्याचे काम हे भाजपच करीत आहे.

आपल्याला सेटलमेंटमध्ये मदत करणारे एकनाथ शिंदे चालतात. मात्र प्रामाणिकपणे पक्षनिष्ठा जोपासून उभे आयुष्य भाजपसाठी खर्ची घालणारा एकनाथ खडसे चालत नाही अशी टीका करत सुषमा अंधारे यांनी भाजप नेत्या पंकजा मुंडे, महादेव जानकर, सदाभाऊ खोत, चंद्रकांत बावनकुळे, विनोद तावडे आदींचे राजकीय करिअर भाजपने संपवल्याचा गंभीर आरोप केला.

# अकराशे लीटर हातभट्टी दारु जप्त; नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर** : नविन वर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारु विरोधात मोहीम राबविण्यात येत असून,दि.२६ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क विभागाने उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा व नान्नज येथे दोन जीपमधून अकराशे लिटर हातभट्टी दारुचा साठा जप्त केला आहे.



२६ डिसेंबर रोजी राज्य उत्पादन शुल्क ब १ विभागाचे दुय्यम निरिक्षक गणेश उंडे यांच्या पथकाने रात्री नऊ वाजेच्या सुमारास नान्नज (ता. उत्तर सोलापूर) येथे महिंद्रा मॅक्स कंपनीची जीप क्र.एम.एच.१३. एसी.१५१० या वाहनातून सात रबरी ट्यूबमध्ये साठवून वाहतूक करीत असतांना ५६० लिटर हातभट्टी दारु जप्त केली. वाहनाचा चालक शिवराज शिवानंद पटणे (वय-३१, रा.बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर) याचे ताब्यातून २८ हजार सातशे किंमतीच्या हातभट्टी दारु व वाहनासह एकूण ४ लाख २८ हजार ७०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. एका अन्य कारवाईत राज्य उत्पादन शुल्क ब विभागाचे निरिक्षक सदानंद मस्करे यांच्या पथकाने रात्री ११ वाजेच्या सुमारास वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील पेट्रोल पंपाच्या समोर महिंद्रा बोलेरो जीप क्र.एम.एच.१२.एफपी. १९८९ या वाहनाला अडवून तपासणी केली असता, त्यात सहा रबरी ट्यूबमध्ये ५४० लिटर हातभट्टी दारु आढळून आली. दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार संचालक सुनिल चव्हाण, विभागीय उप आयुक्त अनिल चासकर, अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरिक्षक सदानंद मस्करे, दुय्यम निरिक्षक गणेश उंडे, अंकुश आवताडे, सहायक दुय्यम निरीक्षक गजानन होळकर, जवान अनिल पांढरे, इस्माईल गोडिकट व प्रकाश सावंत यांनी पार पाडली.

# टी-२० क्रिकेटमधून विराट कोहली घेणार ब्रेक



**नवी दिल्ली** : भारत आणि श्रीलंका यांच्यातील आंतरराष्ट्रीय टी २० सामना जानेवारी महिन्यात खेळवला जाणार आहे.

दोन्ही संघात प्रत्येक तीन सामन्यांची टी२० आणि वनडे सीरिज खेळवली जाणार आहे. परंतु मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघातील स्टार फलंदाज विराट कोहली टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून ब्रेक घेणार असल्याची माहिती बीसीसीआयमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांने दिली आहे. विराट ब्रेक घेतल्यानंतर त्याच्या जागी राहुल त्रिपाठीला संधी मिळण्याची शक्यता आहे. श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेत विराट दिसणार नाही, हे जवळपास नक्की झालं आहे.

# पोलिसांच्या तावडीतून पळालेल्या आरोपीला अटक


**अक्कलकोट** : दक्षिण पोलिसांचे ताब्यातून पळून गेलेला घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी देवराज पवार (रा. अक्कलकोट)यास दक्षिण व अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यांच्या संयुक्त पथकाने सापळा रचून पुन्हा अटक केली.

अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक केल्यानंतर आरोपी देवराज दिलीप पवार (वय १९ वर्षे रा वडार गल्ली) हा दिनांक २४ डिसेंबर रोजी १:३० च्या सुमारास पोलीस ठाण्यातून पळून गेला होता. त्याला अटक करण्यासाठी पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे व अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे यांच्याकडील कर्मचाऱ्यांची एकूण चार तपास पथके तयार करून शोध सुरू केला होता. या पथकांनी अक्कलकोट शहर, अक्कलकोट तालुका, दक्षिण सोलापूर, सोलापूर शहर, अंब्याड किणी, आळंद, मादन हिप्परगा (जि. गुलबर्गा) या ठिकाणी आरोपींचा शोध घेतला. मंगळवार दि. २७ डिसेंबर रोजी आरोपी देवराज पवार हा सरसंबा (ता. आळंद, जि. गुलबर्गा) येथे लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक महेश स्वामी, सहाय्यक निरीक्षक बाबासाहेब काकडे, महेश भावीकटटी, फौजदार रेवणसिध्द काळे, सिद्राम धायगुडे, हवालदार अजय भोसले, राजकुमार कोळी, मल्लीनाथ कलशेट्टी, पोलीस नाईक सुभाष दासरे, नबिलाल मियाँवाले, गणेश अंगुले, सुरेश जाधव, काशिनाथ सदाफुले, पोलीस कॉन्स्टेबल जगदीश राठोड, प्रमोद शिंपाळे, शिवलिंग स्वामी, श्रीकांत जवळगे आणि सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल खंडू माळी यांच्या पथकाने अटकेची कारवाई केली.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पुन्हा जलपर्णी?
पण ती गेली कधी ?

कल्याण
260-81-236
मेन बाजार
245-18-224

# सर्वांना विश्वासात घेऊन पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा : मुख्यमंत्री

**नागपूर** :श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला आषाढी आणि कार्तिकी एकादशीला लाखो तर दररोज मोठ्या प्रमाणात भाविक येतात. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यादृष्टीने प्रस्तावित तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत नव्याने कामे समाविष्ट करण्यात आली आहेत.

या विकास कामात ऐतिहासिक व पुरातन वास्तूचे जतन करुन कामे करण्यात येणार आहेत. तसेच तीर्थक्षेत्र आराखडा तयार करताना लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक, व्यापारी, वारकऱ्यांना विश्वासात घेवूनच करण्यात येणार आहे. याबाबत कोणावरही अन्याय होणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य अमोल मिटकरी यांनी पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा कॉरीडोरबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा राज्य आणि देशाच्या दृष्टीने महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा आराखडा सर्वकष होण्यासाठी वाराणसी आणि तिरुपती या देवस्थानाला सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्या पथकाने भेटी देवून पाहणी केली आहे.



त्याच धर्तीवर मंदिरात येणाऱ्या वारकरी भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, श्रींचे दर्शन सुखकर व्हावे यासाठी मंदिरातील मूळ वास्तूचे व वारकरी सांप्रदायाच्या प्रथा परंपरेचे जतन करून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार मंदिर व मंदिर परिसराचा विकास करण्यात येणार आहे. यासाठी वाराणसी आणि तिरुपतीच्या धर्तीवर स्वच्छता, चांगले रस्ते, शौचालये, हॉस्पिटल आणि चंद्रभागा घाट याकडे लक्ष देवून कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात येणार आहे. छोटे व्यापारी, स्थानिक रहिवासी यांच्या शंकाचे निरसन करून त्यांना विश्वासात घेऊन सर्वांच्या सहकार्याने योग्य मोबदला देणार आहे. शिवाय त्यांचे योग्य पुनर्वसन करण्यात येईल. पंढरपूर तीर्थक्षेत्राचा बहुआयामी व सर्वंकष विकास करण्यासाठी कॉरीडॉरचा नियोजित प्रारूप विकास आराखडा सामान्य जनतेच्या प्रतिक्रिया, आकांक्षा, अपेक्षा जाणून घेण्यासाठी जाहीर करण्यात आला आहे. प्राप्त झालेल्या सर्व हरकती, सूचना यांचा विचार करून कोणावरही अन्याय होणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी दिली.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, तीर्थक्षेत्र आराखड्यामध्ये नदी स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंग, पाणी आदी पायाभूत सुविधेची कामे प्राधान्याने करण्यात येणार आहेत. ही कामे करताना वारकरी परंपरेला व संस्कृतीला धक्का पोहोचणार नाही याची काळजी घेतली जाईल. होळकरवाडा, शिंदेवाडा याबाबत पुरातत्व विभागाच्या सूचनानुसार जतन करून कॉरीडॉर केला जाईल.

तीर्थक्षेत्र विकासाचा प्रारुप आराखडा करताना पुढील २५ वर्षानंतर होणारी गर्दी व वाहतूक व्यवस्था विचारात घेवून करण्यात आला आहे. ९६४ सूचना/हरकती प्राप्त झाल्या असून यात ३६६ सूचना रस्ता रुंदीकरण व मोबदला याबाबत आहेत, असेही श्री सामंत यांनी सांगितले. यावेळी झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य सर्वश्री सचिन अहिर, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर यांनी सहभाग घेतला.

# लोकशाहीचे ‘लडदू’

गेल्या आठवडाभरापासून राज्याच्या लोकशाही मंदिरात म्हणजेच विधी मंडळाच्या दोनही सभागृहांमध्ये काय चालले आहे? असा प्रश्न महाराष्ट्राला पडला आहे. काय भाषा? काय वर्तन? काय गोंधळ? हे सारे चित्र पाहून राज्याचा मनस्ताप वाढत आहे. एकूणच हा प्रकार पाहाता केवळ सरकारच नाही तर विरोधक निर्लज्ज आहेत, असे खेदाने म्हणावे लागेल. आमदार हे विधान भवनातील राज्याचे विश्वस्त असतात तर नगरसेवक आणि झेडपी ते ग्रामपंचायतीपर्यंतचे सदस्य हे लोकल बॉडीचे ट्रस्टी असतात. त्या घटनात्मक संस्थांमध्ये जी सभागृहे आहेत, तिथे लोकांच्या प्रश्नांची आणि लोकांच्या हिताचे निर्णय व्हायला हवेत.पण या सभागृहात गोंधळ व असंसदीय भाषा वापरल्यानंतर ही खरींच लोकशाहीची मंदिरे आहेत की असल्या मुर्दाड लोकांच्या गोंधळाची मंदिरे आहेत, असा प्रश्न पडतो. सभागृहातील ह्या लोकांचे वर्तन आणि भाषा पाहिल्यानंतर त्यांच्यात किती मस्तवालपणा आहे हे दिसून येते. सत्ता आणि संपत्ती असणारी माणसे किती मग्रुरीने वागतात हेही दिसत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधींकडून विधिमंडळाच्या सभागृहात आवाज उठविणे अपेक्षित असते. परंतु नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विधान भवनाच्या बाहेर सत्ताधारी आणि विरोधकांचे आंदोलन दिवसेंदिवस अधिक तीव्र होऊ लागले आहे. विरोधक सत्ताधाऱ्यांच्या विरोधात तर सत्ताधारी विरोधकांच्या विरोधात घोषणा देतात. दिवसेंदिवस या घोषणांचा स्तर खालावत चालला आहे. हिवाळी अधिवेशन सुरू झाल्यापासूनच विरोधक विरुद्ध सत्ताधारी असे आंदोलन सुरू आहे. ‘५० खोके, एकदम ओके’ या विरोधकांच्या घोषणेला सत्ताधारी आमदारांकडून ‘५० आमदार एकदम ओके, घरी बसले माजलेले बोके’ असे प्रत्युत्तर देण्यात आले. ‘भूखंड खाणाऱ्या मुख्यमंत्र्यांचा धिक्कार असो, द्या खोके-भूखंड ओके,’ ‘खाऊन खाऊन पन्नास खोके-माजले बोके,



माजले बोके’, ‘रावणाच्या औलादींचे करायचे काय, खाली डोके वरती पाय,’ गली-गली मे शोर है मुख्यमंत्री चोर है’ या विरोधी पक्षाच्या घोषणांना सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनीही ‘देश के गद्दारों को, जुते मारो सालोंको’, ‘दाऊद के दलालों को, जुते मारो सालोंको’ या घोषणांनी प्रतिउत्तर देण्यात आले घोषणा देताना शिवराळ भाषेचा वापर होत असल्याचे चित्र आहे. मुळात विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसून घोषणाबाजी करणे कितपत संयुक्तिक आहे, असा सवालही या निमित्ताने उपस्थित होतो. सभागृहात एखाद्या महत्त्वाच्या विषयावर लक्ष वेधता येते. मग बाहेर घोषणाबाजी कशाला? सारे प्रसिद्धीसाठी सुरू असते. गोंधळ घालून झाल्यानंतर ह्या आमदारांची चैन असते. अधिवेशनासाठी नागपुरात आलेल्या मंत्री, आमदार तथा सचिव व अन्य अधिकाऱ्यांनी ताडोबात व्याघ्र पर्यटनाचा आनंद लुटला म्हणे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार, असे सलग तीन दिवस नाताळची सुटी आणि अतिविशिष्ट अतिथींच्या आगमनामुळे ताडोबा ‘हाऊसफुल्ल’ झाल्याची माहिती समोर आली. ऑनलाइन नोंदणी हाऊसफुल्ल असतानाही अतिविशिष्ट कोट्यातून अनेकांना प्रवेश देण्यात आला. बघा राजाश्रय असणाऱ्यांची काय ऐष असते? विधानभवन दिसले की गोंधळ आणि सुट्टी लागली की, चैन.व्वा...आमदारसाहेब काय चालले आहे तुमचे? कुणाच्या पैशावर चैन मारता आपण? राज्यात अनेक प्रश्न आहेत. शेतकरी आत्महत्या करत आहे. सरकारने जाहीर केलेला शेतकऱ्यांचा मोबदला त्यांना अजूनही मिळत नाहीय. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकनियुक्त मंडळ नसल्याने तिथला कारभार ठप्प आहे. शेतीमालाला भाव मिळत नाहीय.यासारखे शेकडो प्रश्न असताना तुम्ही तिकडे चैन मारताय? हे आमदार लोक केवळ लडदूच नव्हेतर लोकशाहीचे लाडोबा झाले आहेत. किती टीका झाली काय? किती निंदा झाली काय? त्याची ह्यांना लाज बिलकूल वाटत नाही. सत्ता व पदांना हे लोक हपापलेले आहेत. ज्यांच्याकडे सत्ता नव्हती ते अस्वस्थ होते, सत्तेतून बाहेर पडलेले आज अशांत झाले आहेत. तेव्हा ह्यांना विचारणार कोण? राजकीय पक्षांचे हायकमांड देखील याकडे डोळेझाक करत आपला बेमुर्वतखोरपणा दाखवून देत आहेत. राजकीय पक्षांकडे चर्चेचा व विकासाचा अजेंडा आहे की नाही? जर अजेंडा असेल तर त्यानुसार कामकाज होते की नाही हे पाहणे श्रेष्ठींचे कर्तव्य ठरते. लोकशाहीच्या या लडदूंना आगामी काळात धडा शिकवण्याची गरज आहे. तेव्हा लोकांनी आपल्या मतदानरूपी अस्त्राला आत्तापासूनच धार लावायला सुरुवात करावी, हीच अपेक्षा.

सामाजिक

# लव्ह जिहाद कायदा, घटनात्मक आव्हाने

**श्रद्धा वालकरची हत्या करून मृतदेहाचे ३५ तुकडे करून फेकून दिल्याच्या आरोपाखाली तिचा लिव इन पार्टनर आबताफ पूनावालाला अटक होऊन खुनाचा गुन्हा दाखल झाला. त्यानंतर महाराष्ट्रात ‘लव्ह-जिहाद’विरोधी कायद्याची मागणी होऊ लागली. त्यानंतर महाराष्ट्रात अनेक संघटनांनी मोर्चे काढून सरकारचे लक्ष या प्रकरणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. त्याचाच भाग म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र सरकारसुद्धा या विषयाच्या अनुषंगाने कायदा करण्याच्या तयारीत असल्याचे सूचक वक्तव्य केले आहे, परंतु हा कायदा संमतीने पार पडलेल्या आंतरधर्मीय विवाहाविरुद्ध असणार नाही असे म्हटले आहे. त्यामुळे लव्ह जिहाद कायदा आणि त्या अनुषंगाने त्यासमोरील घटनात्मक आव्हाने याचा केलेला ऊहापोह.**

काही दिवसांपूर्वी उत्तरप्रदेश सरकारने बेकायदेशीर धर्मांतरण करून लग्न करण्याबाबत एक अध्यादेश काढला. त्या अध्यादेशामुळे मोठा वाद निर्माण झाला. त्यालाच लव्ह जिहाद कायदा असे म्हणण्यात येऊ लागले आहे. खरंतर याच कायद्याच्या अनुषंगाने भारतीय राज्यघटनेने धार्मिक स्वातंत्र्याच्या, वैयक्तिक जीवन जगण्याच्या अधिकारांना बाधा पोचवल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. याशिवाय उत्तरप्रदेश राज्याबरोबरच मध्यप्रदेश, कर्नाटक राज्यांनीसुद्धा यासंदर्भात कायदा निर्मितीची प्रक्रिया राबवली आहे. खरंतर नेमके सामान्य वाचकांना लव्ह जिहाद आणि कायदा समजणे गरजेचे आहे. सरकारने केलेल्या कायद्याला उभी राहणारी कायदेशीर आव्हाने त्याबाबत लेखात थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. खरंतर ‘लव्ह जिहाद’ ह्या शब्दाची कोणतीही कायदेशीर व्याख्या नाही. इंग्रजी लव्ह (प्रेम) आणि अरेबिक जिहाद (प्रेरणेने काम करणे, अथवा संघर्ष) हे दोन शब्द एकत्र येऊन ‘लव्ह जिहाद’ संकल्पना अस्तित्वात आली. तरुण हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून मुस्लीम धर्मात आणण्यासाठी मुस्लीम तरुणांकडून प्रयत्न केला जातो, असा आरोप काही संघटना करीत आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. सन २०१५ सालामध्ये केरळ राज्यात ‘हादिया’ नावाच्या होमिओपॅथिकचे शिक्षण घेत असलेल्या २६ वर्षीय हिंदू मुलीने धर्मांतर करून मुस्लीम धर्म स्वीकारून शफिन जहाँ नावाच्या मुस्लीम मुलाशी आंतरधर्मीय विवाह केला. विवाहास मुलीच्या घरच्यांची संमती नव्हती. तिला केरळमधील काही इस्लामिक धार्मिक संघटनांनी फूस लावून धर्मांतर करून लग्न केल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला. त्यानंतर मुलीचे वडील अशोकन यांनी केरळच्या उच्च न्यायालयामध्ये लग्न बेकायदेशीर ठरवून मिळण्यासाठी तसेच मुलीची फसवणूक करून मानवी तस्करीसाठी अशा प्रकारचे कृत्य केले जाते, तसेच त्यांनी एनआयए चौकशी होऊन न्याय मिळण्याची मागणी केली. तसेच अशोकन यांनी मुलीचे लग्न ‘लव्ह जिहाद’चे प्रकरण असल्याचेही आरोप केले.

केरळ उच्च न्यायालयाने हे लग्न रद्द ठरवले. त्याच्या विरोधात जोडप्याने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. केरळ हायकोर्टाचा हादियाच्या लग्नाला रद्द करण्याचा आदेश बाजूला ठेवत सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपक मिश्रा, न्यायमूर्ती खानविलकर, न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी उच्च न्यायालयाने विवाह रद्दबादल करू नये, असे निकालपत्रात नमूद केले. हादियाला कायद्यानुसार लग्न करण्याचे स्वातंत्र्य आहे. विवाह जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. दोन प्रौढ व्यक्तींमधील लग्न कायदेशीर आहे. आपला जोडीदार निवडण्याचा त्यांना कायदेशीर अधिकार आहे. लग्नाबाबत निर्णय घेण्याचा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे. कायद्याने नागरिकांच्या वैयक्तिक निवडीत राज्याला हस्तक्षेप करता येत नाही,



असेही स्पष्ट नमूद केले. तसेच संबंधित मुलीला तिच्या पतीबरोबर जाण्याचा मार्गही मोकळा असल्याचे सांगितले.

तत्कालीन सरन्यायाधीश मिश्रा यांनी निकालामध्ये असे म्हटले की, ‘राज्यच नाही तर प्रौढ मुलीचे पालकसुद्धा मुलीने स्वतःच्या पसंतीने निवडलेल्या व्यक्तीशी लग्न करण्यास विरोध करू शकत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने असेही नमूद केले की राज्याने किंवा मुलीच्या पालकांनी तिच्या पतीच्या निवडीवर प्रश्न उपस्थित करणे गरजेचे नाही. सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात असे नमूद केले की हादिया ही सर्वोच्च न्यायालयासमोर पोलीस संरक्षणामध्ये कोर्टासमोर हजर झाली. तिने लग्न केल्याचे कबूल केले.’ न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी निकालपत्रात असे नमूद केले की जर मुलगी १६ वर्षांच्या आतील असेल आणि ती ७० ते ८० वर्षांच्या पुरुषाशी लग्न करीत असेल तेंव्हा तिच्या लग्नाबाबत तस्करीची शंका येऊ शकते.

जर असे लग्न गरिबी आणि अज्ञानामुळे झाले असेल तर न्यायालयाला खरोखरच स्त्रियांची मानसिकता आणि सामाजिक आर्थिक परिस्थितीचा विचार करून विवाहामध्ये हस्तक्षेप करता येईल, परंतु जेव्हा जेव्हा दोन प्रौढ व्यक्ती आपल्या संमतीने लग्न करण्याचा निर्णय घेतात, त्यामध्ये न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने एनआयएला केरळमध्ये इतर मुलींचे धर्मांतर होत असेल तर त्याबाबत चौकशी करण्याबाबत परवानगी दिली, परंतु सर्वोच्च न्यायालयाने ‘हादिया’ हिने शाफिन जहाँ’ ह्याच्याशी लग्न करण्याच्या निवडीबद्दल चौकशी करता येणार नाही, असे स्पष्टपणे निकालपत्रात नमूद केले. तशी चौकशी ही घटनात्मक हक्कांची पायमल्ली असल्याचेही एनआयएला खडसावले.

उत्तरप्रदेश सरकारने उत्तरप्रदेश विधी विरुद्ध धर्म सपरिवर्तन प्रतिबंध कायदा २०२० हा मंजूर केला. या कायद्यानुसार कायद्याचा भंग करणाऱ्याला कडक कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल. आरोपीने जर जबरदस्तीने, अत्याचार आणि फसवणुकीद्वारे धर्मांतर केल्यास आरोपीवर अजामीनपात्र गुन्हा दाखल होऊन १० वर्षांपर्यंत शिक्षा भोगावी लागेल अशीही तरतूद करण्यात आली आहे. असे प्रकरण आढळल्यास लग्न रद्द होऊन संबंधित आरोपीविरुद्ध अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल. या कायद्याने बेकायदेशीर धर्मांतर, मुलीचा धर्म बदलण्यासाठी केला जाणारा विवाह थांबवण्याची तरतूद केली आहे, असा अध्यादेश काढला. प्रस्तावित कायद्यात १० वर्षांपर्यंत कारावास आणि किमान ५०,००० रुपये दंड करण्याची तरतूद आहे. तसेच महिला अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची किंवा अल्पवयीन असेल तर त्याबद्दलही कायद्यात विशेष सोय आहे. या कायद्यानुसार लग्नानंतर कोणाला धर्म बदलायचा असेल तर त्यासाठी जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे दोन महिन्यांपूर्वी रीतसर अर्ज करून परवानगी घेऊन धर्मांतर करावयाचे आहे. याच कायद्याचा अभ्यास करून महाराष्ट्र सरकार कायदा बनवण्याची शक्यता आहे.

स्पेशल मॅरेज ॲक्ट १९५४ च्या कायद्यानुसार दोन धर्मांतील वय पूर्ण झालेल्या, सज्ञान व्यक्तींना कायद्याने आंतरधर्मीय लग्न करण्याचा अधिकार आहे. या कायद्यामुळे उत्तरप्रदेश सरकारला सध्यातरी आंतरधर्मीय विवाहास बंदी घालता येणार नाही, परंतु सर्वोच्च न्यायालयाने एका निकालामध्ये असे म्हटले आहे की, राज्यघटनेच्या कलम २५ प्रमाणे धार्मिक स्वातंत्र्याबद्दल अधिकार दिले असले तरी त्यास काही तर्कशुद्ध मर्यादा घालून दिल्या आहेत. धार्मिक स्वातंत्र्याचे पालन करताना ते नैतिकतेला धरून असणे गरजेचे आहे. त्यामुळे कायदा-सुव्यवस्था व आरोग्याचे प्रश्न निर्माण होणार नाहीत हेही पाहणे गरजेचे आहे. अशा कायद्यामुळे सरकारला नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली करता येईल का, हा एक प्रश्न सामाजिकदृष्ट्या निर्माण झाला आहे. दुसरी बाजू बघितली तर जर कुणी दुसऱ्या धर्माच्या मुलींची फसवणूक करून जबरदस्तीने धर्मांतर करीत असेल तर त्याला प्रतिबंध घालण्यासाठी कायदा होणे गरजेचे आहे, हेही तितकेच खरे आहे.

(लेखक संगमनेर न्यायालयात वकील आहेत)

**- ॲड. गोरक्ष कापकर.**

टुडेज ब्लॉग

# काँग्रेसचे शिलेदार...

**राष्ट्रवादी संपवण्याची सुपारी घेऊन पृथ्वीराजबाबा चव्हाणसाहेब महाराष्ट्रात आले होते. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यावर 'मी गैर कामावर सही करणार नाही' असा त्यांनी संकल्प केला होता. यामुळेच काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये विस्तव पुरला आणि दोन पक्षाच्या शीतयुध्दाला सुरुवात झाली. त्यांनी टोकाची भूमिका घेऊन शिखर बँकेवर प्रशासक नेमला.**

सहकारी शिखर बँकेला वाचवण्यासाठी व साखर संघाची प्रतिष्ठा राखून आपल्या कालावधीमध्ये पृथ्वीराजबाबांनी राज्य बँकेला आधार म्हणून एकदा ६०० कोटी तर एकदा ५०० कोटी शिखर बँकेकडे वर्ग केले होते. परंतु महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला वाचवण्यासाठी पुन्हा संचालक मंडळाने १०० कोटींची मागणी केली. तेव्हा मात्र, मराठी मुलखाचा मुख्यमंत्री म्हणून मला जेव्हा योग्य वाटले, त्यावेळी मी बँकेला मदत केली. परंतु 'आत्ता जनतेचा पैसा अशापध्दतीने बँकेला देणे मला मान्य नाही.' असे खडसावले.

जनतेच्या पैशावर संचालकांनी दरोडे टाकायचे हे मुळींच चालू देणार नाही, असे खडसावून सांगितले आणि कठोरपणे अखेर मोठ्या कष्टाने राज्य बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर प्रशासक नेमला. आजमितीपर्यंत स्टेट बँकेवर प्रशासक अस्तित्वात असून प्रशासक नेमताना बँकेला ११०० कोटींचा तोटा होता.



आज बँक ७०० कोटींच्या नफ्यात आहे. पांढऱ्या कपड्यातील गिधाडांनी भक्ष शोधायचे आणि फस्त करायचे, गिळून टाकायचे, असा डाव मांडला होता. परंतु, काँग्रेसच्या शिलेदार पृथ्वीराजबाबांनी तो दरोड्याचा डाव उधळून लावला. त्यामुळे बँक वाचली. जनतेचा पैसा सुरक्षित राहिला. अर्थात प्रशासक नेमताना देखील बँकेकडे रितसर बँकेचा परवाना नव्हता. अशावेळी त्यावेळचे केंद्रीय अर्थमंत्री मुखर्जीसाहेब यांच्या आधाराने शिखर बँकेचा कागद नीट-नेटका करण्यात आला आणि सहकारातल्या दादागिरीला त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी आळा घातला.

राज्यभरात कुठे जातीवर, कुठे नसलेल्या ऊस नोंदीवर सातबारा दाखवून साखरधंद्याला पैसे मिळत होते. हे सगळे तात्काळ थांबले आणि चार वर्षात सहकार दुरुस्त झाला. पांढऱ्या कपड्यातल्या नेत्यांचे अनेक नातेवाईक नाव सांगून बँकेत चिकटले होते. अशा फुकट खाऊंना देखील आता कष्टाची सवय झाली आहे.

राज्यभरामध्ये शिखर बँकेची आणि साखरसंघाची कार्यकर्त्यांवर मोठी दहशत होती. ती आता संपुष्टात आली असून प्रत्येक माणसाचा थोडा काळ असतो. मिळालेल्या संधींचा फायदा घेऊन तो राजा म्हणूनच वावरतो. परंतु शासननियुक्त बँकेच्या प्रशासकांनी मिळालेल्या संधींचे सोने केले आणि भविष्यात महाराष्ट्राच्या वैभवाची बँक तरली. मुख्यमंत्र्यांनी सावरली. परंतु आज बँक नफ्यात असताना लहान शेतकऱ्यांचे ऊस लागणीच्या कर्जाची प्रकरणे सुरु झाली तर शेतीला आधार मिळाला, सिंचन वाढले. बँक स्पर्धेत आली. राज्यातल्या उद्योगाला मदत करू लागली आणि रुटींगप्रमाणे कर्ज वाटणे आणि वसूल करणे सुरु झाले आहे. परंतु काहीजण जिल्हा पातळीवर बँक आपल्या हक्काची समजून पैसे भरत नाहीत. हे मात्र वास्तव आहे.

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे, माजी मंत्री प्रांतिक सदस्य भाजप.**

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ५



वेशभूषा करुन आपल्या सौंदर्यात परिवर्तन करु शकतो. परंतु बाह्य-अलंकार धारण करुन मनात परिवर्तन करता येत नाही. वस्त्रालंकारांनी आपण आपले मूळ स्वरुप काही काळ लपवू शकतो. परंतु थोड्या काळाने ते प्रकट झाल्याशिवाय राहत नाही. रामायणातील शूर्पणखेने राम-लक्ष्मणासमोर जाताना सुंदर रुप धारण करुन आपले खरे स्वरुप लपवले होते. परंतु ते दोघे वश होत नाहीत हे लक्षात येताच तिने आपले मूळ स्वरुप प्रकट केले. शिवलिंगावर बसलेला, भगवान शिवाच्या सानिध्यात राहणारा विंचू नागीने डंख करण्याची आपली कृती थोडीच सोडून देत असतो?

म्हणून बाह्य आभूषणे काही काळपर्यंतच मनुष्याचा स्वभावदोष झाकून ठेवू शकतात. ते त्याच्या स्वभावात परिवर्तन घडवू शकत नाहीत. परंतु अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य इत्यादी अंतरंगातील आभूषणे मात्र आपले अंतरंगसौंदर्य वृध्दिंगत करीत असतात. भलेही शरीरावर एकही सुवर्णाचे आभूषण नसले तरीदेखील. धर्मालंकार ज्याच्याजवळ असतात, त्याला त्याचा लाभ होतोच. परंतु इतरांनाही त्यामुळे लाभ होतो. बाह्य अलंकार मात्र अनेक दृष्टींने हानिकारक ठरतात. अंत:करणातील दोष दूर करुन त्याला सात्त्विक करणारे हे दहा धर्मालंकार होत.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## लोकांना त्रास का देता?

जनमानस

महाविकास आघाडीचा मोर्चा, भाजपचे माफी मागो आंदोलन आणि पुकारलेला ठाणे बंद या सर्वांत लोकांचे हाल झाले. या सर्वांचा लोकांना फायदा न होता तोटाच झाला. वाहतूक खोळंबली, ठाण्यात रिक्षावाल्यांनी प्रवाशांकडून बक्कळ भाडे वसूल केले, ठाणे परिवहन सेवा बंद ठेवल्याने परिक्षार्थी विद्यार्थ्यांना त्रास झाला. एकंदरीत हे सर्व बघता लोकांना किती नाहक त्रास झाला याचा अंदाज येतो. पण याकडे लक्ष देण्यास राजकीय पक्षांना आवड - सवड आहे का? एकप्रकारे लोकांनी तोंड दाबून मुक्क्यांचा मारच निमूटपणे सहन केला. सामान्य माणूस राजकीय ताकदीपुढे काय करणार? असा विचार बाजूला ठेवून पुढाऱ्यांना भेटतील तिथे योग्य प्रकारे जाब विचारला पाहिजे. बाराही महिने राजकीय कुरघोड्या चालू असतात. त्यात लोक कुठे ढवळाढवळ करतात? मग तुम्ही लोकांच्या दैनंदिन जीवनात नाक का खुपसता? घरी बसून राहिल्यावर कोणी जेवणाचे आयते ताट आणून देणार नाही. त्यासाठी रोज घराबाहेर पडावेच लागते. सुट्टी घेतानाही विचार करावा लागतो. असे असताना त्यात पडणारी मोर्चा, बंद, आंदोलने यांची भर म्हणजे दुःखावर फुंकर घालण्याऐवजी त्यावर डागण्या देणे आहे.





लोकांना त्रास होईल अशाप्रकारे करण्यात येणारी कोणतीही राजकीय आंदोलने लोकांनी का सहन करायची? याची लोकांना सक्ती का? यांनी बंद घोषित केल्यावर त्या दिवशी प्रवास करताना होणारा अतिरिक्त खर्च, प्रवासी वाहन मिळताना होणारी फरफट यांतून कसा मार्ग काढायचा? यासाठी कोणत्याच राजकीय पक्षाचा कार्यकर्ता लोकांच्या साहाय्याला नसतो. उलटपक्षी जे चालू आहे ते बंद करण्याची बळजबरी करण्यात आघाडीवर असतो. वेगवेगळ्या चुली मांडून वाद घालून राजकीय पोळ्या शेकणे बंद करा. आम्हीच तुमचे कैवारी वगैरे असल्याचे तर अजिबात भासवू नका. राजकीय शक्ति प्रदर्शन, वर्चस्व यांसाठी खटाटोप करताना त्याला उगाचच 'लोकहिता'साठी असे म्हणून लोकशाहीची थट्टा करू नका. लोकांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी एक व्हा. एवढे आधी जमते का ते बघा. लोकच अशा वेळी स्वतः हून तुमच्या साहाय्याला पुढे येतील.

**- जयेश राणे, मुंबई.**

# सत्येश्वराचा ‘शीडम’

झपाट्याने होणारे शहरीकरण, बेलगाम होत चाललेले औद्योगिकीकरण, भौतिक सुखाची असिम लालसा ह्या गोष्टींमुळे दुर्मीळ व जुन्या वृक्षांची संख्या सध्या सर्वत्र झपाट्याने कमी होताना दिसते. कोकणातही चौपदरीकरणाच्या नावाखाली विकासाचे विकासदूत कितीतरी दुर्मीळ व जुन्या वृक्षांच्या मुळावर उठलेले आपण पाहत असताना ,विस्तारलेली एखादे वृक्षवल्ली पाहिली की मनाला ’गारवा’ मिळतो. त्यातही एखादा ‘हेरिटेज ट्री’ पहायला मिळाला की होणारा आनंद अवर्णनीय!

वनसमृद्धीने नटलेल्या कोकणातील लांजा तालुक्यातील वनगुळे गावात असाच एक हेरिटेज वृक्ष ६००-७०० वर्षे दिमाखात उभा आहे. गावचा पालनकर्ता श्री देव सत्येश्वराच्या प्रांगणात असलेला हा महाकाय वृक्षराज दुरूनच लक्ष वेधून घेतो. नजरेत न पावणाऱ्या या महाकाय वृक्षाचे नाव आहे ’शीडम’. महाविद्यालयीन जीवनात इतिहासाची आवड निर्माण झाल्यावर लांजाचा धांडोळा घेताना साधारण २००७ च्या आसपास याची पहिली



भेट झाली. तेव्हापासून त्याने माझा काळीजकोपरा व्यापला आहे. साधारण सहाशे सातशे वयोमान असलेल्या या वृक्षाचे लक्षवेधी खोड त्रिकोणी (तिपाही) प्रकारातील असून इतके रुंद आहे की एखादी एसटी जणू त्या खोडातून सहजच इकडून-तिकडे जाईल. आश्चर्य वाटले ना? पण खरंच. इतके रुंद खोड हे वैशिष्ट्य असलेला हा शीडम पहिल्याच भेटीत माझा जिगरी दोस्त झाला. हा भलाकाय दुर्मीळ वृक्ष सत्येश्वराच्या प्रांगणात रुजल्यामुळे गावातील संकटांचे श्री देव सत्येश्वराने केलेल्या निवारणाचे साक्षीदार होण्याची सुवर्णसंधी त्याला मिळाली. या शीडमाच्या अंगा-खांद्यावर गावातील कित्येक पिढ्या खेळून मोठ्या झाल्या असतील, कितीतरी जुन्या जाणत्यांनी आयुष्याची शेवटची संध्याकाळ याच्या सनिध्यात घालविली असेल. तर कित्येक पिढ्यांनी सत्येश्वराला साक्ष ठेवून गावाच्या विकासाच्या चर्चा याच शीडमाच्या झाडाखालील पारावर केल्या असतील. श्रीदेव सत्येश्वराची इमाने-इतबारे घट्ट पाय रोवून सोबत करणारा निष्ठावान शीडम जणू गावातील पहिला गावकरीच!

उंचच उंच वाढलेल्या, हिरव्यागार वैशिष्ट्यपूर्ण या दुर्मीळ झाडाला पाहणे म्हणजे अवर्णनीय अनुभवच. याचे स्थानिक नाव -’शीडम’ असून त्याचे Botanical Name - Tetrameles Nudiflora R.Br. आहे. मंदिराच्या जीर्णोद्धार व सुशोभिकरणावेळी मंदिराच्या आवारात थोडा भराव टाकण्यात आला. यामुळे सद्यस्थितीत शिडमाचे ६-७ फुट खोड आता जमिनीत लपले गेले आहे. सत्येश्वराच्या मंदिर परिसरात उभा असल्याने हा महाकाय शीडम कदाचित आजवर टिकून राहिला असावा. याकडे कुण्या दृष्टाची नजर गेली नसावी. कारण कोकणात माणसाने स्वतःच्या सोयीसाठी अनेक देवराया देवाचाच कौल घेऊन तोडून टाकल्या आहेत, हे आपण जाणतोच.

डिसेंबरच्या २० तारखेला मुंबई विद्यापीठाच्या पुरातत्व विद्याशाखेचा अभ्यास करणारे दोन विद्यार्थी ’कोकणातील ग्रामदेवतांचा अभ्यास’ करण्यासाठी लांजा तालुक्यात आले असता पुन्हा एकदा अनेक वर्षांनी सत्येश्वरला भेट देण्याचा, शीडमाशी हितगुज साधण्याचा योग जुळून आला. यावेळी या मित्रासोबत फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. छानसा फोटो अभिषेक कढून काढून घेतला. खरं तर लांजा तालुक्यातील वनगुळे हे माझे आवडत्या गावांपैकी एक गाव.त्याला कारणही तसेच. चारही बाजूंनी गोलाकार पसरलेल्या हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत पहुडलेले, निरव शांतता असलेले वनगुळे ज्यांना कोणाला स्वत:चाच शोध घ्यावयाचा आहे अशांसाठी सर्वोत्तम पर्याय असावे असे न राहून वाटते. इथला निसर्गात आपल्याला ताजेतवाने करण्याची ताकद आहे. महाराष्ट्रातील लोकप्रिय लेखक-पत्रकार-संपादक विजय कुवळेकर-व विधीज्ञ-साहित्यिक विलास कुवळेकर या बंधूंचे तसेच श्री वासुदेव महाराज कुवळेकर यांचे हे गाव.

या गावाची दुसरी महत्वाची ओळख म्हणजे गावात असलेली हजारो वर्षापूर्वीची दोन एकाश्म मंदिरे होय. श्री आनंद भागवत सर यांच्या खाजगी जमिनीत ती उभी आहेत. या गावात कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन केंद्राच्या विकासाला बराच वाव आहे.

वनगुळ्यातील हा महाकाय शीडम वृक्ष जुना व दुर्मीळ असल्याने कोकणातील हेरिटेज ट्री मध्ये गणला जातो. असाच एक दुर्मीळ महाकाय शीडम साधारण ३०० वर्षे रत्नागिरी तालुक्यातील हरचिरी गावातील महाकाली मंदिराच्या परिसरात उभा आहे. आजकाल सहसा न दिसणारे, दुर्मीळ होणारे शीडम वृक्षाचे संवर्धन करण्यासाठी वनगुळे गावातील या शीडमाच्या झाडापासून त्याची रोपे तयार करून ती कोकणात लावली गेली पाहिजेत, असे केल्याने येणाऱ्या काही वर्षात शीडमाचे वृक्ष निदान कोकणात तरी नामशेष होणार नाहीत आणि पुढच्या पिढीला त्रिकोणी (तिपाही) खोडाचा, उंचच उंच वाढणारा महाकाय शीडम वृक्षरुपी ठेवा म्हणजे काय याची माहिती व महत्व कळेल.

**- विजय हटकर, लांजा-रत्नागिरी.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# इतिवृत्त मान्यतेपूर्वी वर्क ऑर्डर दिल्याने जलवाहिनीचे काम तत्कालीन सीईओंनी थांबवले

## नूतन सीईओ शीतल तेली-उगले यांची माहिती

**सोलापूर** : स्मार्ट सिटीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यतेपूर्वी वर्क ऑर्डर दिल्याने मक्तेदारास उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम थांबवण्याचे आदेश तत्कालीन सीईओंनी दिले होते, अशी माहिती स्मार्ट सिटीच्या नूतन सीईओ तथा महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.



उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याचा पोचमपाड कंपनीाल दिलेला मक्ता रद्द करून स्मार्ट सिटी कंपनीच्या संचालक मंडळाने कोल्हापूरच्या लक्ष्मी कंपनीला नव्याने मक्ता देण्याचा निर्णय घेतला होता. या कामाची वर्कऑर्डर स्मार्ट सिटी कंपनीचे तत्कालीन सीईओ ढेंगळे-पाटील यांनी दिली होती. त्यानुसार मक्तेदाराने कामही सुरू केले होते, मक्ता देण्याच्या विषयाबाबत स्मार्ट सिटीच्या बैठकीचा इतिवृत्तांवर चेअरमन यांची सही झाली नव्हती. इतिवृत्त मान्यतेपूर्वी मक्तेदारास वर्क ऑर्डर दिल्याचे कारण देत तत्कालीन सीईओंनी हे काम थांबविण्याचे आदेश मक्तेदाराला दिले होते. त्यामुळे समांतर जलवाहिनीचे काम थांबले आहे. या कामाची वर्कऑर्डर देणाऱ्या तत्कालीन सीईओंनीच इतिवृत्तांचे कारण पुढे करीत काम थांबविण्याचे आदेश काढल्याची माहिती विद्यमान सीईओ शीतल तेली-उगले यांनी मंगळवारी पत्रकारांना दिली.

# स्मार्ट सिटीचे असीम गुप्ता, ढेंगळे यांच्या कारभाराची चौकशी करण्याची बेरियांची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

स्मार्ट सिटी चे चेअरमन असीम गुप्ता, आणि सीईओ त्र्यंबक ढेंगळे पाटील यांच्या कारभाराची चौकशी करावी, त्यांनी दुहेरी जलवाहिनीचे काम का थांबवले याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी माजी महापौर यु.एन. बेरिया यांनी पत्रकार परिषदेत केली.

ते म्हणाले शहरांमध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या अनेक कामाबाबत नागरिकांच्या तक्रारी आहेत. हे दोन्ही अधिकारी कुणाला जुमानत नाहीत. वेगवेगळी काम मंजूर होतात आणि रोखलीही जातात. उजनी ते सोलापूर दुसऱ्या लाईनचे काम असंच थांबवण्यात आलं आहे.




हे का थांबलं? हे जनतेला समजायला हवं आणि याला जबाबदार कोण हे ही समजायला हवं. ढेंगळे पाटील यांना दुहेरी जलवाहिनीचे काम थांबवयाचा अधिकार नाही, हे चुकीचे आहे.याची चौकशी व्हायलाच हवी, असे बेहिरया म्हणाले.

### ■ मिळकतकरात ५ टक्के वाढीला विरोध

सोलापूर महापालिकेने गेली २५ वर्षे मिळकतीचे रिविजन केले नाही. मिळकतीत झालेल्या बदल तसेच बिगर घरगुतीची माहिती संकलित करून वेळेवर रिविजन केले असते तर मिळकत कर म्हणून कोट्यावधी रुपयांची भर पडली असती. नागरिकांवर पुन्हा नाहक करवाढ करण्याची वेळ आली नसती. त्यामुळे मिळकतकरात ५ टक्के केलेल्या वाढीला आपला विरोध आहे, असे बेरिया म्हणाले.

### ■ पाणीपट्टीत ५० टक्के माफी द्यावी

सोलापूर शहराला उजनी धरण, टाकळी व एकरूख तलावाच्या तीन स्रोतातून पाणीपुरवठा होत आहे. त्यामधून दररोज १५५ दशलक्षक लिटर पाणी उचलण्यात येत आहे. तरीदेखील शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा करण्यात येत नाही. शहराला चार दिवसानंतर, हद्दवाढ भागास पाच दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येतो. वस्तुस्थिती पाहता महानगरपालिका नागरिकांना वर्षाला फक्त ९० दिवस पाणीपुरवठा करीत आहे व संपूर्ण वर्षाचे बिल घेत आहे. त्यामुळे सर्वसाधारण सभेत पाणीपट्टीत ५० टक्के माफी द्यावी म्हणून तीन वेळा ठराव केला परंतु अंमलबजावणी करण्यात आली नाही. आजही चार - पाच दिवसात आड पाणी देऊन वर्षभराचे बिल वसुली केले जाते. हा जनतेवर अन्याय असून चुकीचे आहे.या पत्रकार परिषदेस निलेश होटकर, अल्लाबक्ष मणियार, इलिया शेख, राजेश कोरे , जुबेर पठाण आदी उपस्थित होते.

### ■ ९ जानेवारी रोजी महापालिकेसमोर आंदोलन करणार

सोलापूर महापालिकेचे सध्या असलेले मिळकत कर भरमसाठ असून इतर महानगरपालिकेच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे मिळकतकरात केलेली वाढ त्वरित रद्द करावी आणि पाणीपट्टीत ५० टक्के सूट देण्यात यावी अन्यथा दि. ९ जानेवारी २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर काळ्या फिती लावून धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.



## जी.बी. घोडके विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सोलापूर** : नान्नज येथील जी.बी.घोडके विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा घेण्यात आला. पुणे, मुंबई अशा शहरातून माजी विद्यार्थी आले होते. या मेळाव्याला अध्यक्ष शत्रुघ्न घोडके, शिक्षक निंबले, गूंड, गरड, गोफने, तोडकर, अगळदिवटे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशवी करण्यासाठी नारायण जानराव, बाळू जानराव, अजित कोळी, संभाजी दडे, विश्वनाथ विभूते, साधना भोसले, अपेक्षा चव्हाण, माधुरी चव्हाण, भगेश्री टोणपे यांनी विशेष योगदान दिले.



## श्रीराधाकृष्ण मूर्तीची देसाईंच्या हस्ते पूजा

**सोलापूर** : होटगी रस्त्यावरील दहिहंडे बंगला (आयकर कार्यालयाच्या बाजूस) याठिकाणी श्रीराधाकृष्ण मूर्तीची विधीवत पूजा तेजस सूर्य धनंजय भाई देसाई (संस्थापक अध्यक्ष हिंदुराष्ट्र सेना राष्ट्रीय अध्यक्ष) यांच्या हस्ते करण्यात आली यावप्रसंगी स्फूर्तीदायक भाषण करून त्यांनी सर्वांचे कौतुक केले. याप्रसंगी उपस्थिती सोलापूर शहर व्यापार उद्योग अध्यक्ष आनंद गोसकी, रवी गोणे (अध्यक्ष सोलापूर शहराध्यक्ष उपाध्यक्ष), आनंद मुसळे (प्रसिद्ध उद्योगपती), प्रमोद हुच्चे, प्रशांत हुच्चे, ॲड. मंगेश श्रीखंडे, ॲड. फुलजळके व हिंदू राष्ट्र सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुंडेटी फौंडेशनतर्फे आरोग्य शिबिर

**सोलापूर** : आरोग्य व शिक्षण या क्षेत्रामध्ये सेवाभावी कार्य करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या गुंडेटी फौंडेशनच्या वतीने गुंडेटी हॉस्पिटल लहान मुलासाठी मोफत मूत्रविकार निदान व उपचार शिबीर घेण्यात आले. शिबिरच्या उदघाटनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवनीत तोष्णीवाल, साहेब ह. गुंडेटी, डॉ. मोहन गुंडेटी, डॉ. माधव गुंडेटी आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबीरामध्ये एकूण ३४ लहान रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. याप्रसंगी प्रोफेसर डॉ. मोहन गुंडेटी, शिकागो, अमेरिका व डॉ. विकास भोसले, डॉ. अक्षय पाटील, डॉ. हिमांशु अगरवाल व डॉ. रोहित निमजे यांनी रूग्णांची तपासणी केली व मार्गदर्शन केले. एकूण ८ रूग्णांसाठी शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला व त्यांच्यावर डॉ. मोहन गुंडेटी, डॉ. विकास भोसले व वरील सहकारी यांनी सोमवार रोजी श्री मार्कंडेय सोलापूर रूग्णालय येथे शस्त्रक्रिया करण्यात आली.

## संत निरंकारी मंडळातर्फे स्वेच्छा सेवांचा शुभारंभ

**औरंगाबाद** : महाराष्ट्राच्या ५६व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे आयोजन निरंकारी मिशनच्या प्रमुख सद्गुरू माता सुदीक्षा महाराज यांच्या पावन सान्निध्यात दिनांक २७, २८ व २९ जानेवारी रोजी औरंगाबाद येथील बिडकीन दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर येथे होणार आहे. या समागमाच्या पूर्वतयारीसाठी स्वेच्छा सेवांचा शुभारंभ रविवार, दि २५ डिसेंबर रोजी असून त्याचे विधिवत उद्घाटन मोहन छाब्रा, संत निरंकारी मंडळाचे प्रमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला. छाब्राजी म्हणाले, की संत निरंकारी मिशन हे सत्य, प्रेम, शांती, मानवता आणि विश्वबंधुत्वाचे मिशन आहे. मिशनचा हा दिव्य संदेश प्रसारित करुन मानवाला मानवाशी जोडण्याचे कार्य या संत समागमाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

## बुर्ला महाविद्यालयाचे आजपासून शिबीर

**सोलापूर** : येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त विशेष श्रमसंस्कार शिबीर कर्देहळळी, (ता. द.सोलापूर) येथे आयोजित केले आहे. हे शिबीर बुधवार दि. २८ डिसेंबर ते मंगळवार दि. ०३ जानेवारी या कालावधीत होणार आहे. या शिबीराचे उद्घाटन २८ डिसेंबर रोजी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

## दशरथ लेंगरे



**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील दशरथ बयाजी लेंगरे (वय ९०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटकयाने मंगळवारी पहाटे दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना नातवंडे असा परीवार आहे. त्यांच्या निधनाने कुसमोड परीसरात शोककळा पसरली आहे.



# पं.नीलकंठ परदेशीमठ यांच्या ग्रंथाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते प्रकाशन

**सोलापूर** : येथील ज्योतिषाचार्य पं. नीलकंठ परदेशीमठ यांनी अनुवाद केलेल्या 'कोण हे यतींवर' या ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य उपस्थित होते. हा चरित्र ग्रंथ पाहून पंतप्रधानृ मोदी यांनी आस्थेने ग्रंथाची माहिती घेतली व ज्योतिषाचार्य नीलकंठ परदेशीमठ यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. वयाच्या आठव्या वर्षी ऋग्वेद कंठस्थ असलेले विजयनगर साम्राज्याचे राजगुरू वंशात जन्मलेले श्री विद्यावाचस्पती श्री शंभुलिंग शिवाचार्य यांच्या जीवन चरित्रावरील हा ग्रंथ असून ह्या ग्रंथात म्हैसूर, काशी, अलाहाबाद, ऋषिकेश, हंपी येथील त्यांची तपस्या, धार्मिक कार्य याची विस्तृतपणे माहिती आहे. आहे. शंभुलिंग शिवाचार्य यांचे पूर्व आश्रमातील नातू नीलकंठ परदेशीमठ यांचे ग्रंथअनुवाद हे फार प्रेरणादायी व मार्गदर्शन देणारे आहे. श्री विद्यानंद शिवाचार्यांनी लिहिलेल्या कन्नड भाषेतील ग्रंथ 'श्री शंभुलिंगेश्वर चरित्र' याचे मराठी अनुवाद नीलकंठ परदेशीमठ यांनी केले आहे. घटीकाशतश्लोकी असलेले शंभुलिंग शिवाचार्य तर्क, न्याय शास्त्र, कला, साहित्य, चपूं काव्य, नाट्य, अलंकार, मिमांसा, वेद, आगम, पुराण, उपनिषद यात प्रकांड पांडित्य होते. त्यांनी ऋग्वेदावर भाष्य लिहिले. त्यांनी ३८ वर्षे तपस्या केली. १०० व्या वर्षी १९८३ मध्ये जीवंत संजीवनी समाधी घेतली. त्यांचे संस्कृत चंपू काव्यात लिहिलेल्या आत्मचरित्रास केंद्रीय साहित्य अकादमीचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. नीलकंठ परदेशीमठ यांचे श्री शाकंबरी स्तोत्र (संस्कृत), श्री वीरभद्र मंत्र कुसुमांजली (संस्कृत), श्री रंभापुरी पीठदर्शन (मराठी) असे चार ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. कोण हे यतींवर' या ग्रंथास श्री रंभापुरी जगद्गुरु डॉ. प्रसन्न रेणुक वीरसोमेश्वर भगवदपाद यांचे शुभाशीर्वाद प्राप्त झाले आहे. श्री गुरुविद्यानंद शिवाचार्य यांचे शुभसंदेश या ग्रंथास लाभले आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस व मुंबईच्या किर्ती कॉलेजचे डॉ.सुभाष अडवतकर, बेळगावच्या राणी चन्नम्मा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. विनोद गायकवाड यांचे अभिप्राय लाभले आहेत. सोलापुरातील रीगल प्रिंटींग प्रेसमध्ये हा ग्रंथ मुद्रित करण्यात आला आहे.

## चाबुकस्वार यांना पीएच.डी.प्रदान

**सुराज्य/सोलापूर**



येथील मातोश्री गंगुबाई केकडे ज्युनिअर कॉलेजचे प्रा. प्रशांत बजरंग चाबुकस्वार यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाने शिक्षणशास्त्र विषयातील पीएच. डी. प्रदान केली. 'विज्ञान शाखेतील इयत्ता अकरावी मधील विद्यार्थ्यांची गणिताबाबतची अभिरुची अभिवृत्ती आणि संपादणूक यांचा तुलनात्मक अभ्यास' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. त्यांना डॉ. अश्विन बोंदार्डे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. ह. ना. जगताप तसेच संस्थेचे सचिव महेश कोठे, अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष देवेंद्र कोठे, संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका प्राचार्य वासुदेव इप्पलपल्ली, मुख्याध्यापिका श्रीमती तनुजा मारपल्ली, प्राचार्या डॉ. वीणा कणबसकर पर्यवेक्षक सतीश मल्लाव, विभाग प्रमुख नवनाथ व्हटकर यांनी अभिनंदन केले.



## इंडियन मॉडेल स्कूलचे विविध स्पर्धेमध्ये यश

**सुराज्य/सोलापूर**

शालेय क्रीडा स्पर्धेत विविध खेळात इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या खेळाडूंनी विविध स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळविले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर महापालिकेच्या यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय शहरस्तरीय १४ वर्षाखालील मुलींच्या गटात डायविंग स्पर्धेत ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड प्रकारात आभा मलजी हिने प्रथम क्रमांक व १७ वर्षा खालील मुलाच्या गटात श्रीगणेश उडता ह्याने १मीटर स्प्रिंग बोर्ड, ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व हाय बोर्ड ह्या प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच १७ वर्षा खालील मैदानी स्पर्धा मध्ये शरयू क्षीरसागर हिने २०० मीटर मध्ये प्रथम क्रमांक व ४०० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. १७ वर्षा खालील थाळी फेक मध्ये ईशा वरवडकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच १४ वर्षा खालील ४०० मीटर मुलांच्या गटात सुजल साबळे ह्याने प्रथम क्रमांक पटकावला. वरील सर्व खेळाडूंनी उत्कृष्ठ कामगिरी करून घवघवीत यश संपादन केले.तसेच त्यांची पुणे विभागीय स्पर्धा करिता निवड झाली आहे.

क्रीडा शिक्षक अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए.डी.जोशी, सचिव अमोल जोशी, साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, अपर्णा कुलकर्णी, ममता बसवंती यांनी अभिनदन केले.

## वज्रमारूती देवस्थानतर्फे सामुदायीक विवाह

**सोलापूर** : येथील गोदुनाई परुळेकर विडी घरकुल 'अ' येथील श्री वज्रमारुती देवस्थान बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दि. १७ मार्च रोजी विडी घरकुल क्रांती चौक येथील पटांगणात सामुदायिक विवाह सोहळा आयोजन करण्यात आले आहे. तरी इच्छुक वधू-वरांच्या पालकांनी अशोक माचन - ७३८५४१४५४८, बाळकृष्ण मलयाल ७०२०६२३३२४ यांच्याकडे नावनोंदणी करावी, असे आवाहन अरूण सिडगिद्दी यांनी केले आहे.

# सार्वजनिक ग्रंथालय सामान्य माणसांचे विद्यापीठ : येळेगावकर

## पत्रकार व कर्मचारी संघाचे अध्यक्ष सदाशिव बेडगे व धोंडिराम जेवूरकरांचा सत्कार

**सुराज्य/सोलापूर**

जीवनात ग्रंथाचे, वर्तमानपत्रांचे, वाचनसाहित्याचे अन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालये साक्षर व ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीत मोलाची भूमिका बजावू शकतात. पुस्तके वर्तमानपत्रे विकत घेण्याची ऐपत नसणा-यासाठी ती सामान्य माणसांची विद्यापीठे आहेत. म्हणून सरकारने सार्वजिन ग्रंथालयांना शंभर टक्के अनुदान द्यावे कर्मचा-यांना वेतनश्रेणी लागू करावी असे प्रतिपादन प्रा.डॉ.येळेगावकर यांनी केले.



शासनाने सार्वजनिक वाचनालयांना ६० टक्के अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेल्या पुणे विभाग ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सदाशिवराव बेडगे, धोंडीराम जेवूरकर या दोघांचा सत्कार करण्यात आला. यावेळी होटगी महाराज संस्थेच्या वतीने सचिव शांतय्या स्वामी यांनीही सदाशिव बेडगे व धोंडिराम जेवूरकर यांचा सत्कार केला. तसेच आकाशवाणी केंद्राचे वृत्तनिवेदक पद्माकर कुलकर्णी, पत्रकार भिमा गवळी, भरतकुमार मोरे, अरविंद मोटे, नंदकुमार येंच्चे यांचा हिराचंद नेमचंद वाचनालयात शाल, नॅपकीन बुके देवून सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भिमाशंकर बिराजदार हे होते.

यावेळी होटगी महाराज संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास सिध्दाराम हलकुडे, रामचंद कदम, अरिहंत रत्नपारखे, नरसिंह मिसालोलू, गिरीश मठपती, तिपय्या मठ,जगदीश गिडवीर, तात्या भोसले, तिपण्णा गणेरी संगीता कुमठेकर, दत्ता मोरे, इ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक तात्या भोसले यांनी केले तर सूत्रसंचालन आभार प्रदर्शन नरसिंह मिसालेलू यांनी केले.

# विविध योजनेअंतर्गत ७ कोटींच्या कामांना मंजुरी : नगराध्यक्ष देशमुख

**सोलापूर** : नगरपंचायतीमध्ये विकास कामाकरिता वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून जवळपास सात कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून लवकरच त्या कामाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती माळशिरस नगरपंचायतीचे नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख यांनी पत्रकारांना दिली.

त्यामध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती या योजनेअंतर्गत नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेच्या माध्यमातून माळशिरस शहरातील प्रभाग क्र.७ मधील तिरखंडी रोड ते आडके वस्ती व तिरखंडी रोड ते वेताळ मंदिर रस्ता खडीकरण / डांबरीकरण करणे या कामासाठी २९ लाख ८८ हजार ८१८ रूपये, तसेच माळशिरस शहरातील प्रभाग क्र.८ मधील सहकार नगर येथील अंतर्गत गल्लीमध्ये भुमिगत गटार करण्यायासाठी २६ लाख ७७ हजार १०६ रूपये माळशिरस शहरातील प्रभाग क्र. २ मधील ६१ फाटा जिल्हास्तर) येडगे वस्ती ते सचिन तरडे वस्ती पर्यंत रस्ता खडीकरण करण्यासाठी रक्कम ३३ लाख ५० हजार ४१०रूपये त्याच बरोबर माळशिरस शहरातील प्रभाग क्र. ४ मधील ६० फाटा कॅनॉल ते विकास बापू वाघमोडे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण करणे. या साठी मंजूर रक्कम २१ लाख १ हजार ५९७ रूपये तसेच माळशिरस शहरातील प्रभाग क्र. १३ मधील जि.प. शाळासमोर व महादेव मंदिराकडे (जाधव वस्ती) जाणारा नवीन आर.सी.सी. पूल बांधण्याकरीता १६ लाख ८३ हजार ९१२रूपये मंजूर करण्यात आले आहेत.



माळशिरस शहरातील प्रभाग क्र. १६ मधील कै. राहुल कोळेकर कमान ते पिलीव रोड ५९ फाटा कॅनॉल पट्टी रस्ता खडीकरणासाठी २८ लाख ८० हजार ६४४रूपये माळशिरस शहरातील प्रभाग क्र. ३ मधील पोळ वस्ती ते खंदारे वस्ती रस्ता खडीकरणासाठी ३१ लाख १९ हजार ४६३रूपये माळशिरस शहरातील प्रभाग क्र.१५ मधील पूणे- पंढरपूर रोड सचिन दोशी यांचे घर ते जुना भांबुर्डी रोड व सपकाळ इमारत ते जुना भांबुर्डी रोड व हॉटेल मायाभुवन ते जुना भांबुर्डी रस्त्यापर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविण्यासाठी ३२ लाख ५३ हजार १०३ रूपये माळशिरस शहरातील प्रभाग क्र.४ मधील सागर देशमुख यांचे घरासमोरील ६१ फाटा कॅनॉलवरती आर.सी.सी. पूल बांधण्यास१० लाख ४४हजार ४१३रूपये. माळशिरस शहरातील प्रभाग क्र.१३ मधील येळीव मायनर ते महादेव मंदिर जाधव वस्ती रस्ता कॉंक्रीटीकरणासाठी १४ लाख ४३ हजार ९१६ रूपये माळशिरस शहरातील प्रभाग क्र. १० अकलूज रोड नजिक अंतर्गत आर.सी.सी. गटार करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविण्यास ३७ लाख ४५ हजार ५४२रूपये तर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत शहरात माळशिरस शहरातील प्रभाग क्र.१२ मधील पूणे- पंढरपूर रोड ते कोर्ट ऑफिस ते पाटबंधारे ऑफिस रस्ता खडीकरणासाठी ६२ लाख २४ हजार ५२२ रूपये. माळशिरस शहरातील प्रभाग क्र.१४ मधील घरकुल चाळ येथील म्हसवड रोड ते ५८ फाटा ते बळीराम गेजगे घर भुमिगत गटार करणे रस्ता डांबरीकरणासाठी ३९ लाख ८६ हजार ८९८रूपये. माळशिरस शहरातील प्रभाग क्र ५ मधील सुमंगल कार्यालय पाठीमागील ननवरे घर ते लोखंडे घर ते अकलूज माळशिरस रोड आरसीसी गटार करण्यास २६ लाख ८४ हजार ५९३रूपये माळशिरस शहरातील प्रभाग क्र.६ मधील काळे घर ते चव्हाण घर व दरवेशी घर ते टेके घर कॉंक्रेट रस्ता करणे व पेहिंग ब्लॉक टाकण्यास २२ लाख ८० हजार ३८रूपये. माळशिरस शहरातील प्रभाग सहा मधील वाघमारे घर ते प्रवीण सावंत यांचे घरापर्यंत आरसीसी गटार करणे व कॉंक्रीट रस्त्यासाठी १६ लाख ३९ हजार १४रूपये. तर नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनाच्या अंतर्गत माळशिरस शहरातील प्रभाग १७ मधील साठे वस्ती,वस्ती वाघमोडे वस्ती रस्ता खडीकरणास ४६ लाख ८९ हजार १९७ रूपये व माळशिरस शहरातील प्रभाकर नऊ मधील पुणे पंढरपूर रोड खलीपे चाळते सचिन बाबत यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे व भूमिगत गटार करण्यास ३० लाख १ हजार ३९८रूपये.

माळशिरस प्रभाग क्रमांक ९ शिंदे मळा येथे रस्ता करण्यास २५ लाख १५४रूपये. माळशिरस प्रभाग क्र १६ काळे वस्ती ते गेजगे वस्ती कोळेकर वस्ती ते ढोबळे वस्ती रस्त्यासाठी २५लाख ४२०रूपये. होलार गल्ली, वडार गल्ली, रेल्वे लाईन, हनुमान व्यायामशाळा, देशमुख वस्ती, आठवडा बाजार तळ, फुलेनगर आदी भागातील शौचालय बांधकामासाठी निधी तसेच माळशिरस नगरपंचायत माळशिरस येथे नवीन सभागृहासाठी ९ लाख ९७ हजार १५६ रूपये, असे एकूण ७ कोटी ६ लाख ८० हजार २१२रूपये याप्रमाणे विकास साधण्याचे काम केले असल्याचे मत डॉ . देशमुख यांनी व्यक्त केले.

> तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे या नगरपंचायतीला जास्तीत जास्त निधी देऊन विधान परिषदेचे आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील व विधानसभेचे आमदार राम सातपुते यांनी माळशिरस साठी अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. यापुढे देखील यांच्याच मार्गदर्शनाखाली माळशिरस नगरपंचायतीच्या विकासाची घोडदौड अशीच सुरू ठेवू.
> **- डॉ.आप्पासाहेब देशमुख, नगराध्यक्ष, नगरपंचायत माळशिरस**



## एसव्हीसीएस प्रशालेत गणित दिन साजरा

**सुराज्य/सोलापूर :** एसव्हीसीएस हायस्कूल एमआयडीसी येथे भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती गणित दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशालेत गणितीय वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याचे उद्घाटन मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक विलास म्हमाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी म्हमाणे म्हणाले, 'विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासूवृत्ती निर्माण होण्यासाठी शालेय स्तरावरील प्रदर्शनासारखे उपक्रम विद्यार्थ्याकरिता महत्त्वाचे असतात. प्रदर्शनातून मिळालेल्या ज्ञानामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासूवृत्ती निर्माण होते, असे सांगून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणितीय वस्तूंची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून माहिती आणून घेतली व प्रदर्शनास सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी गणित विभाग प्रमुख शेंडे पी. जी., पाटील एस. एस., तंबाके आर. एस., कल्याणशेट्टी आर. ए., करकमकर बी. जी., दिंडोरे एस. एन., बिराजदार आर. जी., रामपुरे जी आर, व्हनमाने जी. एस., माशाळे एस. बी., म्हमाणे एस. एस. यांनी परिश्रम घेतले.

# सांगोल्यात केवळ ९ हजार २८४ नागरिकांनी घेतला बूस्टर डोस

**सुराज्य/सांगोला**



कोरोनाला प्रतिबंध करायचा तर सर्वांनी लसचे दोन्ही डोस घेणे गरजेचे आहे. आपली रोगप्रतिकार शक्ती चांगली असायला हवी. सर्वांनी लसचे दोन डोस घेणे हा सर्वोत्तम उपाय आहे, असे शासन आणि प्रामुख्याने आरोग्य विभाग आवाहन करीत आले आहे. परंतु, नागरिकांनी याकडे गांभीर्याने घेतले नसल्याने तालुक्यातील ४५ हजार ०४४ नागरिक आजही कोरोनाच्या लसीकरणापासून वंचितच आहे तर केवळ ९ हजार २८४ नागरिकांनी बूस्टर डोस घेतला असल्याचे तालुका आरोग्य विभागाकडील माहितीनुसार स्पष्ट झाले आहे. इतर राज्यात कोरोनाची भयानक परिस्थिती निर्माण झाली असल्याची बातमी प्रसारमाध्यमावर येत असताना ज्या नागरिकांनी कोरोना लसीकरण घेतले नाही, अशा नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत. शासनाकडून मास्कचा वापर करण्याचे आवाहन केले जात आहे. तालुक्यातील काही शाळा व कॉलेजवर सक्ती करण्यात आले असल्याचे वृत्त आहे.

सांगोला तालुका आरोग्य विभागाकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार १२ ते १४ वयोगटातील ११ हजार ०९० लाभार्थ्यांना लस टोचण्याचे उद्दिष्ट होते. पैकी ९ हजार ४५१ तरुणांनी पहिला पहिला डोस तर ४ हजार ०१ तरुणांनी दुसरा डोस घेतला आहे. या यामध्ये १२ ते १४ वयोगटातील १ हजार ६३८ तरुण लसीकरणापासून वंचित आहेत. १४ ते १७ वयोगटातील १७ हजार १५७ जणांना लस टोचण्याचे उद्दिष्ट होते. पैकी १० हजार ७६९ जणांनी पहिला तर ५ हजार ७३७ जणांनी दुसरा डोस घेतला आहे. यामध्ये १४ ते १७ वयोगटातील ६ हजार ३८८ जन लसीकरणापासून वंचित आहेत तसेच अठरा वर्षाच्या पुढील २ लाख ५८ हजार ७४४ नागरिकांनी पहिला तर १ लाख ५९ हजार ८४७ नागरिकांनी दुसरा डोस घेतला आहे. यामध्ये ३७ हजार ०१७ नागरिक लसीकरणापासून वंचित आहे. १२ ते वयोवृद्ध नागरिकांपर्यंत २ लाख ८६ हजार ९९१ पैकी २ लाख ४१ हजार ९४७ नागरिकांनी लस घेतली आहे. उर्वरित ४५ हजार ४४ नागरिक लसीकरणापासून वंचित आहेत. महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार सांगोला तालुक्यात कोरोनालसीकरण करण्याची मोहीम सुरू आहे.

या मोहिमेस अल्प प्रतिसाद मिळत असल्याने लसीकरणाला गती मिळत नाही नागरिकांनी स्वतःहून लसीकरण घ्यावे, असे आवाहन तालुका आरोग्य विभाग व सांगोला ग्रामीण रुग्णालय यांच्याकडून केले जात आहे.

## नदीच्या पुलावरून पडून एकाचा मृत्यू

**सुराज्य/पंढरपूर :** पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या पुलावरून खाली पडल्याने ४२ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचारा दरम्यान सोमवारी रात्री मरण पावला. सुनील किसन जाधव (वय ४२ रा. अंबाबाई पटांगण पंढरपूर) असे मयताचे नाव आहे. त्याला शिंदीचे व्यसन होते. व्यसन बंद केल्यामुळे तो त्रस्त होता. सोमवारी सकाळी तो नदीच्या पुलावरून जात असताना तोल जाऊन खाली पडल्याने जखमी झाला होता. त्याला दत्ता जाधव (भाऊ) यांनी सोलापुरात दाखल केले असता तो रात्री मरण पावला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## लोखंडी अँगल आणि खोऱ्याने मारहाण

**सुराज्य/माढा :** लव्हे (ता. माढा) येथे घरासमोरील सांडपाण्याचा भांडणावरून लोखंडी अँगल आणि खोऱ्याने केलेल्या मारहाणीत हंबीरराव मनोहर लोहार (वय ४०) हे जखमी झाले. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना कुर्डूवाडी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात नागनाथ (मुलगा) यांनी दाखल केले. जखमीचा भाऊ बाबासाहेब लोहार आणि अन्य एकाने मारहाण केली, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**सुराज्य/सोलापूर :** मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर येथे सन २००० - २००१ दहावी बॅच माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते. प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, युसुफ शेख, काशिनाथ मळेवाडी, सुधाकर कामशेट्टी, प्राथमिकचे मुख्या. सचिन जाधव, पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार,सुनील घोळवे,यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

माजी विद्यार्थ्यांतर्फे अध्यक्ष, प्रमुख अतिथी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा गुलाब पुष्प, शाल व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रशालेतर्फे माजी विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी यावेळी स्वपरिचय करून दिला. या बॅचचे विद्यार्थी डॉक्टर, शिक्षक, इंजिनियर अशा मोठ्या पदावर व काही विद्यार्थी विविध क्षेत्रांत नोकरी करत आहेत. सुनिता कुलकर्णी, डॉ.संतोष नगरे, डॉ. प्रशांत तरंगे, सतिश पोतदार, सरोज मंगरुळे, सचिन शिरगुरे, पत्रकार प्रमिला चोरगी, सचिन हुल्ले, प्रसाद शिंदे या माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेबद्दल स्नेह, कृतज्ञता, गौरवोद्गार, स्मृती या भावना आपल्या मनोगतात व्यक्त केले.यावेळी युसुफ शेख ,मारुती माने, सुमन देवराळे, बसवेश्वर बुरकुल, सविता कुलकर्णी, दत्तात्रय अगरखेड यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक ना. वकील नागेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन गजानन कुलकर्णी यांनी केले तर आभार नितीन पवार यांनी मानले.

## उदनवाडीत लांडग्याच्या हल्ल्यात ४ शेळ्या ठार

**सुराज्य/सांगोला :** सांगोला तालुक्यातील उदनवाडी येथील वस्तीवर एका शेतकऱ्याच्या घराजवळील वाड्यावर लांडग्याने हल्ला केल्याने चार शेळ्या जागीच मृत्यू झाल्या आहेत. ही घटना मंगळवार दि. २७ डिसेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास घडली आहे.

उदनवाडी येथील मळ्यात बाळू ईश्वर सरगर यांचे शेत आहे. त्यांच्याकडे पशुधनासह सात शेळ्या आहेत. घराजवळच या शेळ्या बांधल्या होत्या. मंगळवारी पहाटे चारच्या सुमारास अचानक लांडग्याच्या कळपाणे हल्ला केला. यातील दोन शेळ्या दोन बोकडांचा फडशा पाडला. ही घटना कळल्यानंतर चार शेळ्या जागेवरच मृत्यू झाल्या होत्या. यामुळे या गरीब शेतकऱ्यांचे पन्नास हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तालुक्यात लांडग्याचे हल्ले होण्याचे प्रमाण वाढले आहे. जुनोनी वनपरिक्षेत्रांतर्गत असलेल्या या भागातही लांडग्यांच्या टोळ्या मोठ्या प्रमाणात आहेत. वन्य प्राण्यांना पिण्यासाठी पाणी नाही. त्यामुळे ते सैरभैर झाले आहेत. वन विभागाने या घटनेचा पंचनामा केला आहे.

## पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरून लोखंडी पाईपने मारहाण; चौघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

आमच्या विरुद्ध पोलिसात वारंवार तक्रार का करतो? या कारणावरून दुकानात घुसून लोखंडी पाईप आणि काठीने केलेल्या मारहाणीत एका महिलेसह तिघेजण जखमी झाले. ही घटना शेटफळ (ता.करमाळा) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जखमीमध्ये कृष्णा सोनटक्के (वय ३०) त्याचे वडील महादेव सोनटक्के (वय ५५) आणि पत्नी प्रियांका (सर्व रा.शेटफळ) या तिघांचा समावेश आहे. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. या प्रकरणात पोलिसांनी अशोक रामा गुंड त्याचा भाऊ नवनाथ गुंड, समाधान गुंड आणि साहेबराव गुंड (सर्व रा. शेटफळ) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

जरवमी कृष्णा सोनटक्के आणि त्याचे वडील महादेव असे गावातील आपल्या इस्त्रीच्या दुकानात काम करीत होते. त्यावेळी अमोल गुंड याच्यासह चौघांनी त्यांना ठार मारण्याची धमकी देत लोखंडी पाईप आणि काठीने मारहाण केली. त्यांची पत्नी प्रियांका ही भांडण सोडवण्यात आली असता तिला देखील त्यांनी मारहाण केली, अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार गवळी घटनेचा पुढील तपास करीत आहेत.



## बस न सुटल्यामुळे विद्यार्थिनी अंधारातच ताटकळल्या

**सुराज्य/वैराग**

एकीकडे महिला शाळकरी मुलीं बाबतीत सरकार दक्षता घेत असले तरी शाळा सुटून तीन तास झाले तरी वैरागवरून उस्मानाबादला जाणारी बस न सुटल्यामुळे शालेय विद्यार्थिनींना अंधारातच ताटकळत उभे राहून ताणतणावा बरोबरच महामंडळाच्या ढिसाळ कारभाराला सामोरे जावे लागले.

वैराग येथे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी दररोज शेकडो विद्यार्थी वैरागच्या आजूबाजूच्या गावातून येजा करत असतात. मंगळवारी पावणे ५ वाजता शालेय विद्यार्थिनींची शाळा सुटल्यानंतर तब्बल साडेसात वाजेपर्यंत उस्मानाबादला जाणारी बस नसल्यामुळे रातंजन, मालेगाव, मुंगशी, रुई व गौडगाव जाणाऱ्या विद्यार्थिनी व इतर प्रवाशांना याचा फटका बसला.

> वैरागवरून उस्मानाबादला जाणाऱ्या गाड्यांमध्ये वेळेच्या बाबतीत नेहमी अनियमितता आहे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना व प्रवासी याचा फटका बसत आहे.
> **- बापूराव गवळी, रुई.**

विद्यार्थिनींशी संवाद साधला असता बऱ्याच वेळा उस्मानाबाद जाणाऱ्या बसचे वेळापत्रक कोलमडलेले असते. त्यामुळे आमची शाळेची गैरसोय होत असल्याचे विद्यार्थिनी बोलताना सांगितले.

वैराग बस स्थानकातून बार्शी डेपोची सुटणारी साडेसहा वाजताची बस गेल्या अनेक दिवसांपासून रद्द केल्यामुळे उस्मानाबादवरून आलेल्या बसशिवाय विद्यार्थ्यांना पर्याय नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा सुटल्यानंतर तीन तीन तास ताटकळत बस स्थानकावर उभारावी लागत आहे. तरी बार्शी डेपोकडून साडेसहाला बंद करण्यात आलेली बस पुन्हा सुरू करण्याची मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रथम

### 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' स्पर्धा

**सुराज्य/सोलापूर**



किर्लोस्कर वसुंधरा इको रेंजर 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' स्पर्धेत विजयपूर रस्त्यावरील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने प्रथम क्रमांक पटकावला.

कॉलेज ऑफ फार्मसीने द्वितीय तर वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्या महाविद्यालयांना किर्लोस्कर फेरसचे फॅक्टरी मॅनेजर विलास खरात, कॉलिटी अॅश्युरन्स विभागाचे प्रमुख पी. एल. माडुळकर एच. आर. मॅनेजर ऋषिकेश कुलकर्णी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाअंतर्गत ही स्पर्धा घेण्यात आली. यात सोलापुरातील १२ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. आपला महाविद्यालय परिसर पर्यावरणपूरक करण्यासाठी १५ विद्यार्थी आणि १५ विद्यार्थिनी यांच्या गटाने महाविद्यालयात सहा महिन्यांच्या अवधीत प्रकल्प तयार करण्याची ही स्पर्धा होती. प्रा. व्यंकटेश गंभीर आणि डॉ. निनाद शहा यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. विजेत्या महाविद्यालयांना सन्मानचिन्ह देण्यात आले. सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन एच.आर. मॅनेजर ऋषिकेश कुलकर्णी यांनी केले.

## स्नेहसंबंध जोपासण्यासाठी स्नेहमेळाव्याची गरज : चाकोते

**सुराज्य/सोलापूर :** स्नेहसंबध जोपासण्यासाठी स्नेह मेळाव्याची नितांत गरज आहे असे प्रतिप्रादन श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते यांनी केले.

कुमठे येथील श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना संचलित श्री सिध्देश्वर प्रशालेत २००४-०५सालच्या दहावीमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता, यावेळी मार्गदर्शन करताना उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्रभारी मुख्याद्यापक कलप्पा गुरव होते तर व्यासपीठावर मुख्याद्यापक सिध्देश्वर म्हेत्रे, माजी मुख्याद्यापक चंद्रकांत रोट्टे. सुरेखा हुल्ले. योगीनाथ चांगले. सिध्देश्वर मेणसे, अंबण्णा कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन उपस्थित गुरुजंनाचा स्वागत सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी नवीन बोअरवेल मारुन दिले. बोअरवेलला अडीच इंच पाणी लागल्याने शाळेतील विद्यार्थ्यांचा पिण्याच्या पाणी प्रश्न सुटल्याने उपस्थित सर्वानींच यावेळी समाधान व्यक्त केले. स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी धनंजय कारंडे, मधुरा कुलकर्णी, अल्ताफ मुल्ला, योगेश चक्रे, आनंद गायकवाड यांच्यासह माजी विद्यार्थी परिश्रम घेतले.

## रोटरीच्यावतीने जयपूर फूट शिबिराचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर :** सोलापूर शहर रोटरी परिवाराच्यावतीने दिव्यांगांना मोफत जयपूर फूट व कृत्रिम हात देण्याचे शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष निहार बुरटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि. ६ आणि ७ जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत इंडियन रेड क्रॉस सोसायटी दमाणी ब्लड बँक, डफरीन चौक येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. जवळपास २५० दिव्यांग जणांना हात आणि पाय देण्याचे उद्दिष्ट आहे. .या पत्रकार परिषदेस रोटरीचे अतुल सोनी, केदार कहाते, जयेश पटेल, धनश्री केळकर, राजन होरा, राहुल चंडक, अतुल चव्हाण, सचिन चौधरी ,अविनाश मठपती आदी उपस्थित होते.

## भावसार विजनचा वार्षिक पुरस्कार सोहळा

### जवळकर, हिबारे आणि फुटाणे पुरस्काराने सन्मानित

**सुराज्य/सोलापूर :** गेल्या सोळा वर्षापासून सोलापुरातील भावसार समाजातील अग्रेसर असलेल्या भावसार विजन सोलापूर क्लबचा वार्षिक पुरस्कार सोहळा नुकताच थाटात संपन्न झाला. निमाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर विनायक टेंभुर्णीकर आणि भावसार समाज अध्यक्ष गोविंदराव हिबारे हे यावेळी उपस्थित होते.



सोहळ्याची सुरुवात गायत्री मंत्राने झाली. यानंतर समाजातील दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्ष राज निकते यांनी सर्वांचे स्वागत केले आणि वर्षभरात भावसार विजनने केलेल्या कामाचा आढावा पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादर केले.

या सोहळ्यात भावसार विजन क्लबमधील आशिष जवळकर यांना बेस्ट डायरेक्टर नागनाथ हिबारे यांना बेस्ट मेंबर तर दत्तात्रेय फुटाणे यांना बेस्ट अटेंडंट या पुरस्काराने डॉ. विनायक टेंभुर्णीकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावर्षी भावसार विजनने भावसार समाज आणि इतर समाजातील देणगीदारांकडून तब्बल दोन लाख रुपयाची देणगी गोळा केली होती. या सोहळ्याला भावसार समाजातील बापू ढगे सरिता जवळकर, अनिल हिबारे, रवींद्र खमितकर, अरुण आकुडे, सुनंदा हिबारे, गिरीश माळवतकर उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवाजी उपरे यांनी तर आभार मल्लिनाथ बासुतकर यांनी केले.

## जनआधार फाऊंडेशनला सन्मानपत्र देऊन सन्मानित



**सुराज्य/सोलापूर :** येथील जनआधार फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते आनंद गोसकी यांनी गेल्या १० वर्षापासून सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांच्या मुंबई येथील निवासस्थानी त्यांच्या हस्ते जनआधार फाऊंडेशनला सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

जनआधार फाऊंडेशनच्या माध्यमातून आनंद गोसकी यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच तळागाळातील लोकांपर्यंत शासकिय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी झटत आहेत. गेल्या १० वर्षात, आनंद मधुकर गोसकी हे 'प्रेझेंट ऑन कॉल' पध्दतीने सर्वांना हिरीरीने मदत करीत असतात. आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर आयोजित केली. या माध्यमातून गरजूंना रक्ताची उपलब्धता करण्यापासून, प्रसंगी ते मोफत रक्त उपलब्ध करण्यापर्यंत सोय करीत आले आहेत.

# दिव्यांगावर मात करून संगीत क्षेत्रात झेप

**सुराज्य/अक्कलकोट**

सोलापूर जिल्हा अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर गावचे सुपुत्र जन्मतः दोन्ही डोळ्याने दिव्यांग असलेल्या परंतु दिव्यांगत्वावर मात करत तबलावादन, हार्मोनियम वादन, पॅड, कीबोर्ड, विणा आधी वाद्य वाजवण्यामध्ये कुशल असलेल्या आणि वाद्य वाजवत गायन करणारा कुमार रेवणसिद्ध पुंडलिक फुलारी अवघ्या १४ वर्षाच्या बालक आज कर्नाटक राज्यातील नंबर वन टीव्ही वाहिनी झी कन्नड वहिनीवरील कर्नाटक राज्यातील नंबर वन सिंगिंग रियालिटी शो सारेगामापा लिटल चॅम्प्स सीजन १९ साठी निवड होऊन संगीत क्षेत्रातील दिग्गजांच्या कौतुकास पात्र ठरत यशस्वी झेप घेतल्याने संपूर्ण सोलापूर जिल्हा समवेत महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील संगीत रसिकांचा गळ्यातील ताईत बनला आहे.

ग्रामीण भागातील एका छोट्याशा गावात जन्मलेल्या आणि जन्मतः दोन्ही डोळ्याने दिव्यांग असलेल्या कुटुंबाला कोणत्याही संगीताचे पार्श्वभूमी नसताना हाताला मिळालेल्या घाघर, बकेट, टोपली, बादली, ग्लास आदी वस्तूंचे वाद्य म्हणून वाजवत गावातील बँजो गाडीचे आवाज ऐकताच तिथे हजर राहून वाद्य वाजवत गायनाला सुरुवात करून संगीताचे प्रारंभ घरातून सुरुवात करून कमी कालावधीत कर्नाटक राज्यातील कन्नड झी वाहिनीवरील अत्यंत प्रसिद्ध असलेल्या सारेगमप लिट्ल चॅम्पस सीजन १९ साठी निवड होवून मागील आठ एपिसोडमध्ये उत्तम गायन करत सलग चार आठवड्यापासून बेस्ट परफॉर्मन्स ऑफ द विक, इंस्पिरेशनल




सिंगर ऑफ द विक, बेस्ट परफॉर्मर ऑफ द विक, व्हाईस ऑफ द विक असे सलग दहा हजाराचे चार पारितोषिक पटकावून कर्नाटकातील आणि देशातील संगीत क्षेत्रातील दिग्गजांचा भुया उंचावणारा दिव्यांग गायक रेवणसिद्ध फुलारींचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

विशेष करून कर्नाटक राज्यातील डॉ. राजकुमार घराण्यातील हॅटट्रिक हिरो शिवराज कुमार यांनी स्वतः व्यासपीठावर जावून मिठी करून गायनाचे कौतुक करत गीता फिच्चर्सकडून पन्नास हजार रुपये बक्षीस म्हणून दिल्याने नक्कीच आत्मविश्वास बळावला आहे. तमाम महाराष्ट्रातील आणि कर्नाटकातील संगीतावर प्रेम करणारे सर्व मान्यवरांना विनंती आहे. आपण सर्वांनी रेवणसिद्ध फुलारी यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्यासाठी आपण सर्वांनी आपल्या मोबाईलमधून साधा टेक्स्ट मेसेज बॉक्समधून ५७५७५ या नंबरवर इंग्रजी कॅपिटल अक्षरमध्ये REV टाईप करून मेसेज करून वोटिंग करायचा आहे. दररोज ९९ मेसेज तुम्ही पाठवू शकता.

दिव्यांग बालकलाकार रेवणसिद्धला कर्नाटकातील फिल्म क्षेत्रातील क्षेत्रातील दिग्गज कलाकार हॅट्रिक हिरो शिवराज कुमार, डी बॉस दर्शन, प्रेम, रक्षिता, आनंद, संगीत क्षेत्रातील भीष्म पितामह नादब्रह्म डॉ. हंसलेखा, विजय प्रकाश, अर्जुना जन्या, प्रसिद्ध अँकर अनुश्री तसेच इतर कॉमेडी कलाकाराना रेवणसिद्ध सर्वांचे आवडता बनला आहे. तसेच रेवणसिद्ध फुलारीच कौतुक करताना दिसत आहे.येणाऱ्या पुढील काळात रेवणसिद्ध फुलारी नक्कीच ग्रँड फीनाले मध्ये पाहण्यासाठी संगीत क्षेत्रातील रसिक श्रोते उत्सुक आहे.



## माने शिक्षण संकुलात क्रिडा सप्ताह

**उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापुर तालुक्यातील होनसळ येथील दिलीपराव माने प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात क्रिडा साप्तहाचे उदघाटन संस्थेचे सहसचिव अमित भडकुंबे यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्तर उत्तर सोलापुरच्या माजी सभापती रजनी संभाजी भडकुंबे उपस्थित होत्या. जीवनात खेळ व व्यायामाचे महत्व सांगितले.क्रिडा सप्ताहात खो खो, कबड्डी, क्रिकेट, हॉलीबॉल, लंगडी, गोळाफेक, थाळीफेक, बुध्दीबळ, स्लो.सायकल, लिंबुचमच्या, रनिंग, संगीत खुर्ची, कॅरम अस्या विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून सर्व विद्यार्थ्यांनी खेळाचा लाभ घ्यावा असे आवाहन रजनी भडकुंबे ह्यांनी केलं आहे. आहेत. यावेळी क्रिडा प्रमुख धर्मदेव शिंदे, प्रा.राजेंद्र मोहोळकर, सचिन नाईकनवरे, आश्पाक आत्तार, विनोद राउत,सुधाकर पवार, तात्यासाहेब तांबे, गायकवाड, अक्तर सय्यद, उमेश जगताप, जरीना सय्यद मेघा वाघमारे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



## डॉ.देशमुख यांची जयंती अकलूज येथे साजरी

**अकलूज** : अकलूज तलाठी कार्यालयात भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ पंजाबराव देशमुख यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी मंडल अधिकारी चंद्रकांत भोसले,तलाठी किसन शिंदे, सहायक तलाठी गणेश भानवसे,कोतवाल सुभाष मोरे, काँग्रेस प्रदेश संघटक तथा जनसेवा महिला आघाडीच्या ज्योतीताई कुंभार, वेळापूर तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दिलीप बनसोडे, पत्रकार डी एस गायकवाड आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापड गावात शेतकरी कुटुंबात डॉ पंजाबराव देशमुख यांचा जन्म झाला. कृषी आणि शैक्षणिक क्षेत्रात पंजाबराव देशमुख यांचं मोठं कार्य आहे. महाविद्यालये, अभियांत्रिकी पदवी, तसेच पदविका तंत्रनिकेतन, कृषी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये सुरू करुन शिक्षण क्षेत्रात त्यांनी मोठं योगदान दिलं अशी माहिती यावेळी मंडल अधिकारी चंद्रकांत भोसले यांनी दिली. यावेळी बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.




## कराटे स्पर्धेत श्रीपुरच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**श्रीपूर** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने माळशिरस येथे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत श्रीपुर येथील श्री चंद्रशेखर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजन गटामध्ये ८ सुवर्ण, ३ रौप्य पदक ,अशा १२ पथकासह यश संपादन केले आहे. विजयी स्पर्धक पुढील प्रमाणे सई कवडे ३४ किलो सुवर्णपदक, प्रार्थना कुलकर्णी ४७ किलो सुवर्णपदक, कुणाल कवडे ४४ किलो सुवर्णपदक, पृथ्वी कचरे ५६ किलो सुवर्णपदक, कपिल थोरात ५८ किलो सुवर्णपदक, स्वप्निल चव्हाण ७० किलो सुवर्णपदक, माऊली डंगळे ५४ किलो सुवर्णपदक, विजय कांबळे ६० किलो सुवर्णपदक, दिग्विजय पवार ६० किलो पदक, अभिषेक सलगर ५४ किलो रौप्य पदक, ओम नागणे ६० किलो रोप्य पदक, ओम गायकवाड ७० किलो कास्यपदक हे सर्व विद्यार्थी श्री चंद्रशेखर विद्यालय नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय श्रीपुर येथे शिकत आहेत. सदर विद्यार्थीचे श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व कामगार कल्याण मंडळाचे मार्गदर्शक डॉक्टर यशवंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या कामगार कल्याण मंडळाच्या श्री पांडुरंग क्रीडा संकुलामध्ये कराटे प्रशिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षक महादेव ताकतोडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री पांडुरंग कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी, कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष डॉक्टर सुधीर पोफळे, सचिव सोपान कदम, कामगार युनियनचे सदस्य विजय पाटील, लाला जाधव, श्री चंद्रशेखर विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग बनसोडे, क्रीडा शिक्षक केचे, धाराव आदींनी अभिनंदन केले आहे.



## डॉ.देशमुख यांची जयंती वेळापूर येथे साजरी

**वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथील वेळापूर ग्रामपंचायत येथे शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२४ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वेळापूर ग्रामपंचायतीचे नूतन सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन होऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड. विठ्ठल मंडले, तुषार पवार, नागेश क्षीरसागर, तसेच बापू घोरपडे, सुभाष माने, महेश देवकते, नागेश नाईकनवरे, दीपक जाधव, बाबा तुपे, अंकुश साठे, अवि मुंगुसकर, सौ पूजा लावंड, अनिता शिंदे आडत, आदी.

# पशुधन विमा योजना पुन्हा चालू करणार : विखे-पाटील

### ▪ आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रश्नावर विखे-पाटील यांचे उत्तर

**सुराज्य/अकलूज**

राज्यातील लम्पी रोगाचा प्रादुर्भाव, त्यासाठी विलगीकरण कक्षाची अवश्यकता, मुत्युमुखी पडलेले पशुधन, त्यांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ करण्याची गरज व पशुधनाच्या अकाली मृत्यूमुळे होत असलेल्या प्रासंगिक हानीपासून वाचविण्यासाठी उपयुक्त असलेली पशुधन विमा योजना सध्या बंद आहे ती योजना चालु करण्यासंदर्भात आज विधानपरिषद सभागृहात आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी प्रश्न उपस्थित केले असता महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्यासाठी एक व्यापक पशुधन विमा योजना चालू करणार असल्याची माहिती सभागृहात दिली.



यावेळी सभागृहात बोलताना मंत्री विखे पाटील यांनी लम्पीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संसर्गित जनावरांना अवश्यकतेनुसार विलगीकरण कक्ष उपलब्द करुन देण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्ह्याधिकार्यांना निर्णय घेण्याचे अधिकार दिले असल्याचे सांगुन संसर्गित जनावरांच्या उपचारासाठी, औषधे, साधनसामुग्री, उपकरणे, इत्यादीसाठी जिल्हा नियोजन समितीतुन प्रत्येक जिल्ह्यास ३ कोटी रु निधी उपलब्ध करुन दिला असल्याचे सांगितले.

आ.मोहिते पाटील यांनी बाजारात संकरीत गायींच्या किमती १ लाखांपासुन पुढे तर बैलांच्या किमती साधारण ७५ हजार च्या पुढे असुन, शासनाकडून लम्पी आजाराने मृत्युमुखी पडलेल्या गायींसाठी ३० हजार, बैलांसाठी २५ हजार तर वासरांसाठी १६ हजार रुपयांची मिळणारी नुकसान भरपाई तटपुंजी आहे. राष्ट्रीय आपत्ती धोरणानुसार मिळणाऱ्या मदतीत सरसकट वाढ करण्यात यावी अशीही मागणी केली. यावर सकारात्मक विचार करण्याचे अश्वासन दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. लम्पीमुळे मृत्यु झालेल्या जनावरांना शासन मदत करत आहे परंतु लम्पीमुक्त झालेल्या जनावरांच्या सकस आहारासाठी आणि आजारावर झालेल्या खर्चासाठी शासनाने कोणतीही मदत केलेली नाही. त्यामुळे दुध उत्पादक शेतकर्यांना आधार देण्यासाठी शासनाने लम्पीमुक्त जनावरांवर झालेला खर्चासाठी अनुदान देण्यासंदर्भात देखील आ.मोहिते-पाटील यांनी प्रश्न उपस्थित करत मागणी सभागृहाच्या पटलावरती आणली.

महाराष्ट्राने देशात लम्पी रोगावर उत्कृष्ट काम केले असुन जनावरांचा रिकव्हरी रेट च्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असुन लम्पी रोगावरील लसींचे उत्पादन महाराष्ट्रात लवकरच सुरु करनार असल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. यावेळी सभाग्रहात झालेल्या चर्चेत महादेव जानकर, गोपीचंद पडळर एकनाथ खडसे,सचिन आहीर, विरोधी पक्षनेते अंबादास दावने, यांनी सहभाग घेतला होता.

## बोरोटी येथे ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारणीसाठी मिळाली मान्यता

▸ ५ कोटी ८६ लाख खर्च तर आठ गावे व एक हजार ६५० शेतकऱ्यांना होणार लाभ

**सुराज्य/अक्कलकोट**

बोरोटी व परिसरातील आठ गावे यांना वारंवार भेडसावणाऱ्या कमी दाबाच्या विजेच्या समस्या पासून दिलासा देण्यासाठी बोरोटी बुद्रुक येथे सुमारे ५ कोटी ८६ लाख रुपये खर्चाच्या नवीन ३३/११ के व्ही विद्युत उपकेंद्र निर्मितीसाठी मंजुरीचे आदेश प्राप्त झाल्याची माहिती अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील बोरोटी (बु), बोरोटी (खु), तळेवाड, कल्लप्पावाडी, बबलाद, हालहळ्ळी (मैं ), सातनदुधनी, आंदेवाडी(ज)आदी आठ गावांना सध्या मैंदर्गी व दुधनी येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रमधून विद्युत पुरवठा होत आहे. या उपकेंद्रावर कृषी व इतर ग्राहकांची संख्या वाढल्याने सुरळीत वीज पुरवठा होत नव्हता.तांत्रिक अडचणीमुळे विद्युत पुरवठा कमी दाबाने होणे, ओव्हर लोड लाईन ट्रिप होणे. त्यामुळे शेतीवरील मोटारी व डी.पी. (रोहित्र) वारंवार जळत होते. या आठ गावांतील शेतकऱ्यांना सुरळीत विद्युत पुरवठा करण्यात अडचणी येत होत्या .बोरोटी येथे उपकेंद्र सुरु झाल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत होईल व शेतीवरील मोटारी व डी. पी. (रोहित्र) जळण्याचे प्रमाण कमी होईल.मागील कित्येक वर्षापासून शेतकऱ्यांना प्रचंड त्रास होत होता.मुबलक पाणी उपलब्ध असूनही वीज पुरवठा सुरळीत नसल्याने पिकाला पाणी पुरेशे देता येत नव्हते. पिकांची वाढ नीट न झाल्याने आर्थिक नुकसान होत होते.यामुळे या भागातील सर्व शेतकरी, सरपंच यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे वारंवार नवीन उपकेंदासाठी मागणी करीत होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या या गैरसोयीचा प्रकार व शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी



आ.कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमोर मांडले आणि यासाठी सतत वारंवार पाठपुरावा केला.

कृषी आकास्मिक निधी मधून सदर विद्युत उपकेंद्राच्या ५ कोटी ८६ लाख रुपये खर्चाच्या मंजूरीचे आदेश प्राप्त झाले व लवकरच कामास सुरुवात होईल. याचा फायदा या आठ गावातील साधारण १ हजार ६५० शेतकऱ्यांचा वीज पुरवठा सुरळीत होणार आहे. यासाठी अक्कलकोट येथील विद्युत केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## बार्शी जनसेवा हायस्कूलचे विश्वनाथ कुलकर्णी यांचा सत्कार

**बार्शी** : जनसेवा हायस्कूलमधील सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ कुलकर्णी यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. धानोरे गावचे सरपंच आणि सेवानिवृत्त शिक्षक औदुंबर देशमुख यांच्या वतीने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



व्ही.एस.कुलकर्णी हे इंग्रजी विषयाचे गेल्या पिढीतील नामवंत शिक्षक. त्यांनी बारावी ते बी ए पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सुमारे पंचवीस वर्षे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. इंग्रजी विषय कच्चा असणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांना सरांनी इंग्रजीमध्ये पारंगत बनवले. अनेक गरीब विद्यार्थ्यांना ते मोफत शिकवीत तसेच शैक्षणिक साहित्याची मदतही करीत. औदुंबर देशमुख हे सरांचे विद्यार्थी त्यांनी सरांविषयी कृतज्ञता म्हणून, स्वतःच्या सेवानिवृत्तीचे आणि सरांच्या वयाच्या ८१वी चे निमित्त साधून सरांचा शाल, श्रीफळ, फेटा आणि पुष्पहार देऊन सत्कार केला. सरांसोबत सुखदेव मगर आणि मच्छिंद्र क्षीरसागर यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.बबनदादा शिंदे, आमदार भगवान साळुंखे, माजी मंत्री सुभाष बापू देशमुख, सदस्य सुभाष माने, तेरणा समूहाचे सीईओ पंडित काका देशमुख इत्यादी मान्यवरासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयाच्या जी.एन.एम.शाखेच्या प्रवेश क्षमतेत वाढ

**अध्यक्षा शीतलदेवी मोहिते-पाटील यांची माहिती**

**अकलूज** : अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्था, संचलित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँन्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूटच्या जी.एन.एम या नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्याशाखेच्या प्रवेश क्षमतेकरीता अधिक तीस जागाच्या वाढीसाठी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनपर व संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार संस्थेने दाखल केलेल्या प्रस्तावास वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरिश महाजन यांनी मान्यता दिल्याची माहिती शीतलदेवी मोहिते-पाटील यांनी दिली.



विजयसिंह मोहिते पाटील स्कूल ऑफ नर्सिंग महाविद्यालयात ३० विद्यार्थी प्रवेशक्षमते नुसार जी.एन.एम अभ्यासक्रम सुरू होता.परंतू नर्सिंग क्षेत्रात जी.एन.एम या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांचा प्रवेश घेण्याचा वाढता काल लक्षात घेता महाविद्यालयाने अधिकच्या प्रवेश क्षमता वाढीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल केला होता. त्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली व संस्थेस सन २०२२-२३ साठी ३० (तीस विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीसह एकूण ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरू करण्यास शासनाकडून मान्यता प्राप्त झाली आहे.

## शासन निर्णया व्यतिरिक्त वैयक्तिक श्रद्धेचे फोटो जि.प.शाळात लावू नयेत

**प्राथमिक शिक्षण विभागाचे पत्र**

**टेंभूर्णी** : प्राथमिक तसेच माध्यमिक शाळातील वर्गात तसेच कार्यालयात सर्रासपणे शासन निर्णया व्यतिरिक्त इतर अनेक फोटो लावलेले दिसून आल्याने असे वैयक्तिक श्रध्देचे फोटो शाळांमध्ये लावण्यास प्रतिबंध करावा यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांना निवेदन देण्यात आले होते.



या वैयक्तिक श्रध्देच्या असंवैधानिक प्रतिमा शाळांमधून संबंधित शाळांनी न काढल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाभर मोहिम राबवण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी निवेदनाद्वारे दिला होता.त्यानुसार आता शासन निर्णयानुसार ठरवुन दिलेल्या महापुरुष, महामाता, राष्ट्रीय अस्मिता, संविधान व प्रतिमा या व्यतिरिक्त वैयक्तिक श्रध्देचे फोटो शाळेत लावणे असंवैधानिक असुन असे फोटो लावण्यास प्रतिबंध करण्यात यावा अशा आशयाचे पत्र जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांना पाठवले आहे. आमच्या मागणीला यश आले असुन या पत्रामुळे अंधश्रध्देला खतपाणी घालणारे वैयक्तिक श्रध्देचे फोटो शाळांमधून निघणार असून वैज्ञानिक दृष्टिकोन हे मुल्य विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागण्यास मदत होईल असे मत संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी व्यक्त केले.

## पंढरपूर येथे नदीच्या पुलावरून पडल्याने एकाचा मृत्यू

**सुराज्य/सोलापूर**

पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या पुलावरून खाली पडल्याने ४२ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचारा दरम्यान सोमवारी रात्री मरण पावला.

सुनील किसन जाधव (वय ४२ रा.अंबाबाई पटांगण पंढरपूर) असे मयताचे नाव आहे. त्याला शिंदेचे व्यसन होते. व्यसन बंद केल्यामुळे तो त्रस्त होता. कालं सोमवारी सकाळी तो नदीच्या पुलावरून जात असताना तोल जाऊन खाली पडल्याने जखमी झाला होता. त्याला दत्ता जाधव (भाऊ) यांनी सोलापुरात दाखल केले असता तो रात्री मरण पावला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## नातेपुते येथील डी.जी.मार्टच्यावतीने घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरण

**नातेपुते** : नातेपुते येथील डीजी मार्ट यांच्यावतीने क्रिसमसचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी भव्य रंगभरण चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये नातेपुते येथील डॉ.बा.ज. दाते प्रशाला, चंद्रप्रभू इंग्लिश मीडियम स्कूल, समता इंग्लिश मीडियम स्कूल, एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीसी स्कूल या सर्व शाळेतील १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.



स्पर्धा चार वेगवेगळ्या गटांमध्ये घेण्यात आल्या होत्या. स्पर्धेसाठी मार्गदर्शक व परीक्षक म्हणून पुरुषोत्तम भरते काम पाहत होते. सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे, बारामती येथील अजिंक्य बिग बाजार चे संचालक अजिंक्य गांधी, डीजी मार्ट चे संचालक दिलीप गांधी, अमित गांधी, यश दोशी, अतुल दोशी, दर्शन गांधी हे मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून रंगभरण स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी प्रास्ताविक मधून बोलत असताना दिव्या गांधी म्हणाले की, समाजामध्ये विविध प्रकारची कार्य करीत असताना त्या कामांना समाजातील अनेक घटकांचा हातभार लागतो म्हणूनच समाजाबाबतचे ऋण फेडण्यासाठी ख्रिसमस सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. पुरुषोत्तम भरते बोलत असताना म्हणाले की, चित्र रंगवणे व काढण्यातून मुलांमध्ये एकाग्रता निर्माण होते. त्या एकाग्रतेचा फायदा विद्यार्थ्यांना सर्व विषयांसाठी वापरता येतो.

अशा स्पर्धेमधून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत असतो असे चित्रकला विषयाचे शिक्षक पुरुषोत्तम भरते यांनी विद्यार्थी व पालकांसमोर आपले मत व्यक्त केले. सदर कार्यक्रम नातेपुते येथील डीजी मार्ट समोर घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिव्या गांधी यांनी केले असून आभार दर्शन गांधी यांनी मानले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपा गांधी दिव्या गांधी भाग्यश्री गांधी दक्षता दोशी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी व पालक तसेच शिक्षक उपस्थित होते.

## शिक्षणमहर्षी चषकाचा मानकरी ठरला तुळजापूरचा रावनराज क्लब

**सुराज्य/वैराग**

जय जगदंबा शैक्षणिक परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रात्रटेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेत शेवटचा सामना अतिशय चुरशीचा ठरला. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात तुळजापूरच्या रावणराज क्रिकेट संघाने मोडनिंबच्या एमसीसी संघाला सहा धावांनी नमवत शिक्षण महर्षी चषक पटकावत एक लाख २७ हजार रुपयांचे मानकरी ठरले.

वैराग येथील जय जगदंबा शैक्षणिक परिवाराच्या वतीने डॉ कपिल कोरके यांच्या मार्गदर्शनाखाली डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धा ग्रामीण व शहरी अशा दोन विभागात खेळवण्यात आलेल्या स्पर्धेत ३२ संघांनी भाग घेतला होता. आठ दिवस चालू असलेल्या या स्पर्धा पंचक्रोशीत चर्चेचा विषय ठरल्या होत्या. पोलिस निरीक्षक विनय बहिर, डॉ सचिन चव्हाण, अरुण सावंत, पै.नंदकुमार पांढरमिसे, हरीश रोचकरी, आप्पासाहेब कानगुडे, वैजीनाथ आदमाने, श्रीशैल्य भालशंकर, उजेश करडे, आनंद कोरके, सतिश मस्के, आनंद कानगुडे, रोहन गडसिंग, सागर कानगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. पहिल्या क्रमांचे बक्षीस वैराग पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विनय बहिर व आप्पासाहेब कानगुडे यांच्या हस्ते प्रथम एक लाख सत्तावीस रुपये रोख व ट्रॉफी रावनराज क्रिकेट संघ तुळजापूर यांना प्रदान करण्यात आले.



मान्यवरांच्या हस्ते द्वितीय क्रमांक एक्का हत्तर हजार सत्तावीस व ट्रॉफी, तृतीय क्रमांक व्ही.सी.सी वैराग ४१०२७ व ट्रॉफी, चतुर्थ क्रमांकसाहेबप्रेमी क्रिकेट क्लब पेनूर ३१०४७ याच बरोबर उत्कृष्ट फलंदाज योगेश खलाटे, मॅन ऑफ द मॅच - सौदागर जाधव, उत्कृष्ट गोलंदाज सौदागर साळुंखे, मालिका वीर कृष्णा गवळी यांना रेंजर सायकल बक्षीस देण्यात आली. यासामण्यासाठी पंच म्हणून संतोष भोसले, गिरीष कुलकर्णी यानंतर सामान्यांचे समालोचन शंकर पवार यांनी केले. नऊ दिवस सामान्यांचे गुणलेखक म्हणून तानाजी गवळी, बाळासाहेब बरबडे, धनाजी डोईफोडे यांनी काम पाहिले. बक्षिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन सुधीर गायकवाड व आनंदकुमार डुरे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जगदंबा परिवाराचे अध्यक्ष डॉ.कपिल कोरके यांच्या मार्गदर्शनाखाली जगदंबा परिवारातील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सीमाप्रश्नी पुनर्विचार याचिका दाखल करण्याची ठाकरे यांची मागणी

✔ सुराज्य/नागपूर

**सीमाभागातील अन्यायग्रस्त मराठी भाषिकांच्या मागे आपण ठामपणे उभे असल्याचा ठराव विधिमंडळात मांडून तो मंजूर करण्यात आला. महाराष्ट्राच्या हिताचे जे काही असेल तिथे दुमत असल्याचे कारण असूच नये, या मताचे आम्ही सगळे आहोत. म्हणूनच आम्ही ठरावाला एकमताने पाठिंबा दिला, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली.**



जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत हा संपूर्ण जो कर्नाटकव्याप्त महाराष्ट्र आहे तो भूभाग केंद्रशासित झाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे. मात्र २००८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने असा प्रदेश केंद्रशासित करता येणार नसल्याचे म्हटल्याचे आम्हाला सांगण्यात आले. परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी असेही न्यायालयाने म्हटले आहे. वास्तविक २००८ पर्यंत हे ठीक होते. पण त्यानंतर परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा जो आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे, त्याची अंमलबाजावणी कर्नाटकात होत नाही. उलट अत्यंत आक्रमकपणे कर्नाटक सरकार एक एक पाऊल पुढे टाकत चालले आहे. पुढे असे होईल की महाराष्ट्र संयमाने वागेल, मजबुतीने उभा राहील. पण आपल्या डोळ्यादेखत तिथला मराठी ठसा पुसला जाईल आणि तो पुसला जाऊ नये यासाठी आपल्या सरकारकडून एक पुनर्विचार याचिका ताबडतोब सर्वोच्च न्यायालयात होण्याची गरज आहे, अशी मागणी ठाकरे यांनी केली.

सीमा वादासंदर्भात देशाच्या गृहमंत्र्यांकडे दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची आणि आपल्या उपमुख्यमंत्र्यांच्या सोबत बैठक झाल्यानंतरही कर्नाटकने ठराव मांडला. या ठरावात त्यांनी एक इंच देखील जमीन आम्ही महाराष्ट्राला देणार नाही, असा एक आक्रमक आणि कौरवी थाटाचा ठराव केला. राज्यात विधिमंडळ अधिवेशन सुरू असताना साहजिकच अधिवेशनाच्या माध्यमातून आपल्याकडूनही त्याला एक उत्तर देण्याची गरज होती. मी सरकारचे अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो, की निदान तिथल्या सीमाभागातील जे अन्यायग्रस्त मराठी भाषिक, माता-भगिनी आणि बांधव आहेत, त्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत, असा ठराव त्यांनी आज मंजूर केला. त्याला साहाजिकच आम्ही पाठिंबा दिला, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

मंगळवारी मांडण्यात आलेल्या ठरावानुसार तिथल्या नागरिकांना आपल्याकडून काही सुविधा देण्यात येणार आहेत. मात्र, त्यामध्ये थोडी स्पष्टता पाहिजे. आपण त्या लोकांना योजनांद्वारे लाभ देणार आहोत हा ठरावातील चांगला मुद्दा आहे.

मूळ मुद्दा हा योजनांचा नाही तर भाषिक अत्याचाराचा आहे. आपण भाषिक अत्याचाराबाबत काय करणार आहोत? हा प्रश्न अनुत्तरित आहे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. याचिकेत सर्वोच्च न्यायालयाकडून जोपर्यंत संपूर्ण निकाल लागत नाही, तोपर्यंत हा संपूर्ण भूभाग केंद्रशासित करण्याचा आग्रह केला पाहिजे, या मागणीचा पुनरुच्चारही त्यांनी यावेळी केला.

# लम्पीवर सप्टेंबर २०२३ पर्यंत लस येणार : विखे-पाटील

✔ सुराज्य/नागपूर



**राज्यातील ३३ जिल्ह्यातील १ लाख ७८ हजार ७२ गोवर्गीय जनावरे लम्पी आजाराने बाधित झाले, मात्र वेळेत १०० टक्के लसीकरण पूर्ण केल्याने पशुधनाचा मृत्यू रोखता आला. यात सप्टेंबर २०२३ पर्यंत महाराष्ट्र लम्पीविरोधातील लसीकरणात स्वयंपूर्ण होणार आहे. तसेच ही लस राज्यातचं तयार होणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानपरिषदेत दिली आहे.**

प्रश्नोतराच्या तासादरम्यान आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी लम्पी आजाराबाबत प्रश्न उपस्थित केल्या. ज्यावर मंत्री विखे-पाटील यांनी सविस्तर उत्तर दिले आहे. यावेळी विखे-पाटील म्हणाले की, 'राज्यातील काही जिल्ह्यात लम्पी आजार बळावत होता. यावेळी केंद्र सरकारच्या मार्गदर्शन सुचनांनुसार, जनावराचे तातडीने लसीकरण करण्याचा निर्णय घेतला, राज्य सरकारने यावेळी वेगाने १०० टक्के लसीकरण पूर्ण केल्याने पशुधनाचा मृत्यू दर कमी झाला. यामध्ये राज्याचे विशिष्ट पद्धतीचा अवलंब करत लसीकरण पूर्ण केले.

प्रत्येक जिल्ह्यात औषध बँक आणि तीन कोटी रुपये दिले, राज्य शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना केंद्र सरकारने स्वीकारल्या आहेत.'

पशुधनाचा मृत्यू झाल्यास राष्ट्रीय आपत्ती निवारण धोरणातील आर्थिक निकषानुसार अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. यामध्ये मृत गाय ३० हजार, बैल २५ हजार आणि वासराला १६ हजार रुपये देण्यात येत आहे. मात्र यामध्ये आणखी वाढ करण्याबाबत राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असेही विखे पाटील यांनी सांगितले.

---

# नव्या समीकरणाची नांदी

## वंचित आघाडी महाविकास आघाडीत सामील होणार?

✔ सुराज्य/मुंबई



वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीत सामील होण्याबाबत हालचालींना पुन्हा एकदा वेग आला आहे. या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांची विशेष बैठक सोमवारी शिवसेना भवन येथे पार पडली. या बैठकीनंतर वंचित बहुजन आघाडी लवकरच महाविकास आघाडीमध्ये येईल, असा विश्वास शिवसेना नेते सुभाष देसाई यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडी युतीसंदर्भातील चर्चेची फेरी शिवसेना भवन येथे सोमवारी पार पडली. यावेळी देसाई आणि वंचित बहुजन आघाडीचे मुंबई प्रदेश अध्यक्ष अबुल हसन खान यांच्यात सविस्तर चर्चा झाली. युती संदर्भातील चर्चेची अंतिम फेरी पार पडल्यानंतर लवकरच दोन्ही पक्षांचे प्रमुख एकत्र येऊन युतीची अधिकृत घोषणा करतील, असे खान यांनी यावेळी नमूद केले.

कोचर अटक प्रकरण

# कोठडीसंदर्भात तातडीच्या सुनावणीला नकार

✔ सुराज्य/मुंबई

बँक कर्ज गैरव्यवहाराप्रकरणी झालेली अटक आणि विशेष न्यायालयाने सुनावलेली कोठडी बेकायदा असल्याचा दावा करून आयसीआयसीआय बँकेच्या माजी मुख्य कार्यकारी अधिकारी चंदा कोचर आणि त्यांचे पती दीपक कोचर यांनी त्याविरोधात मंगळवारी उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, याप्रकरणी तातडीच्या सुनावणीची आवश्यकता नाही, असे स्पष्ट करून न्यायालयाने कोचर यांना दिलासा देण्यास नकार दिला.

# नाकावाटे देण्याची 'इन्कोव्हॅक' लसीबाबत मोठी अपडेट

## लस फक्त इथेच मिळणार

✔ सुराज्य/मुंबई



कोव्हिशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या दोन्ही लशी इंजेक्शनद्वारे देण्यात येतात. त्यामुळे भारत बायोटेकने तयार केलेल्या नाकाद्वारे देण्यात येणाऱ्या 'इन्कोव्हॅक' लसीच्या प्रतिक्षेत अनेकजण होते. नाकावाटे देण्यात येणारी ही लस देण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली असली तरी ती फक्त खासगी रुग्णालयातच उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना ही लस विकतच घ्यावी लागणार आहे. या लसीची किंमत अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

केंद्र सरकारने भारत बायोटेकच्या 'इन्कोव्हॅक' या नाकावाटे देणाऱ्या लशीला मान्यता देण्यात आली, त्यानुसार ही लस कोविन ॲपवरही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र, या तिची किंमत अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यातच आता राज्य सरकारकडून ही लस उपलब्ध होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. भारत बायोटेकची इन्कोव्हॅक ही लस फक्त खासगी रुग्णालयातच उपलब्ध असेल असे, राज्य आरोग्य सेवा कार्यालयाने स्पष्ट केलं आहे.

इन्कोव्हॅक ही लस १८ वर्षे आणि त्यावरील नागरिकांना देण्यात येणार आहे. या लसीचे दोन्ही नाकपुड्यांमध्ये प्रत्येकी चार थेंब टाकायचे आहेत. तसेच २८ दिवसांनंतर लसीची दुसरा डोस घ्यावा लागणार असल्याचे आरोग्य सेवा कार्यालयाचे अतिरिक्त संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी स्पष्ट केले आहे. ही लस सरकारतर्फे देण्यात येणार नसल्याने नागरिकांना ती विकत घ्यावी लागणार आहे.

# कोरोना काळातील वैद्यकीय उपकरणे धूळ खात

✔ सुराज्य/पुणे



कोरोना काळातील केंद्र आणि राज्यसरकारकडून महापालिकेला मिळालेली बहुतांश वैद्यकीय उपकरणे सध्या धूळ खात पडली आहेत. जम्बो रुग्णालयात वापरण्यात आलेल्या खाटांपासून ते केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या व्हेंटिलेटरपर्यंत बहुतांश उपकरणांवर धुळीचे थर साठले आहेत. केंद्र सरकारच्या सूचनांनुसार मंगळवारी विविध रुग्णालयांमध्ये 'मॉकड्रील' करताना या उपकरणांवरील धूळ झटकली जाणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत केंद्र-राज्य सरकारकडून महापालिकेला विविध उपकरणे मिळाली. विशेषत: दुसऱ्या लाटेत 'पीएम केअर' फंडातून शंभरहून अधिक व्हेंटिलेटर महापालिकेला प्राप्त झाले. कोरोनाची लाट ओसरल्यानंतर महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये ही उपकरणे वापरणे शक्य होते. मात्र, काही मोजकी उपकरणे वगळता उर्वरित सर्व उपकरणे बाणेर येथील महापालिकेच्या रुग्णालयात पडून आहेत. त्यातील किती उपकरणे सुस्थितीत आहेत, बंद उपकरणांची दुरुस्ती झाली आहे का, याची अद्ययावत माहिती आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाही.

# राज्यातील ३ कोटी ग्राहकांना 'महावितरण'चा सुखद धक्का

## नववर्षात मीटर रीडिंग घोळ संपणार

✔ **सुराज्य/कोल्हापूर : राज्यातील तीन कोटी ग्राहकांना 'महावितरण'ने सुखद धक्का दिला आहे. मीटर रिडिंगमध्ये घोळ घालून ग्राहकांची होणारी लूट थांबविण्यात 'महावितरण'ने मोठे यश मिळवले आहे. हा घोळ ४५ टक्क्यावरून केवळ १.९ टक्केपर्यंत कमी झाला आहे, नवीन वर्षात तो शून्य टक्के करण्याचा मानस असल्याने अचूक मीटर रिडिंगमुळे ग्राहकांची लूट पूर्णपणे थांबणार आहे.**



राज्यात महावितरणचे साधारणत: दोन कोटी ९० लाख ग्राहक आहेत. या ग्राहकांच्या मीटरचे फोटो काढून बिलिंग केले जाते. हे काम ६०० कंपन्यांना दिले आहे; पण गेले दोन-तीन वर्षे या कंपन्यांच्या कामाबाबत प्रचंड तक्रारी होत्या. अस्पष्ट फोटो काढणे, मीटरऐवजी भिंतीचा फोटो काढणे, मीटरचा फोटो व्यवस्थित न काढणे, घरात बसून परस्पर दुसराच फोटो सर्व्हरला लोड करणे अशा असंख्य तक्रारी होत्या. याबाबत तक्रारी वाढल्यानंतर 'महावितरण'चे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी कारवाई सुरू केली. ७६ कंपन्यांना बडतर्फ करण्याबरोबरच अनेकांवर वेगवेगळ्या प्रकारची कारवाई केली. संबंधित अधिकारी व सर्व कंपन्यांची बैठक घेऊन सतत पाठपुरावा केला.

या अचूक रिडिंगमुळे 'महावितरण'च्या नफ्यात दरमहा साधारणत: अडीचशे कोटी रुपयांचा महसूल वाढला. यामुळे वार्षिक तीन हजार कोटींचा महसूल वाढल्याने संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम झाली.

# सहाराविरोधात सेबीची मोठी कारवाई

✔ सुराज्य/मुंबई : सहारा इंडियामध्ये देशभरातील लाखो गुंतवणूकदारांचे पैसे अडकले आहेत. लोकांना त्यांचे पैसे अजून परत मिळालेले नाहीत. आता सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने (सेबी) सहाराचे प्रमुख सुब्रत रॉय यांच्यावर कडक कारवाई केली आहे.

ओएफसीडी जारी करताना नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सेबीने सहारा समूहाची कंपनी सहारा इंडिया रिअल इस्टेट कॉर्पोरेशनच्यावतीने कारवाई केली आहे. या प्रकरणी सेबीने सहारा समूह कंपनीचे प्रमुख सुब्रत रॉय आणि कंपनीच्या अन्य तीन अधिकाऱ्यांची बँक खाती, डिमॅट खाती आणि लॉकर्स सील करण्याचे आदेश दिले आहेत.

सहारा समूहाशी संलग्न असलेल्यांमध्ये सुब्रत रॉय, अशोक रॉय चौधरी, रविशंकर दुबे आणि वंदना भार्गव यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून दंड आणि व्याजासह एकूण ६.४२ कोटी रुपये वसूल करायचे आहेत.

# एक लाख बालकांना गोवरची लसी

✔ सुराज्य/मुंबई : गोवर उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर राज्यसरकार स्थापित कृतीदलाने एकही बाळ लसीपासून वंचित राहू नये म्हणून गोवर रुबेला लसीकरण मोहिम हाती घेतली आहे.याअंतर्गत १५ डिसेंबरपासून दोन टप्प्यांमध्ये लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे.

# नाशिक येथील रेणुकादेवी सूतगिरणीचा लिलाव

✔ सुराज्य/नाशिक



नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थकबाकी वसुलीसाठी आक्रमक पवित्रा घेत हिरे कुटुंबाला मोठा दणका दिला आहे. थकबाकीपोटी जप्त केलेल्या मालमत्तांची विक्री सुरू केली असून, हिरे कुटुंबाशी संबंधित मालेगाव येथील रेणुकादेवी औद्योगिक सहकारी सूतगिरणीची लिलाव प्रक्रिया सुरू केली आहे.

जिल्हा बँकेच्या माजी संचालकांनी घेतलेल्या चुकीच्या आर्थिक निर्णयांमुळे जिल्हा बँक सध्या आर्थिक संकटात आहे. बँकेच्या निव्वळ शेतीकर्जाची थकबाकी १९१० कोटींपर्यंत पोहचली असून, त्यात १३७० कोटींची जुनी थकबाकी आहे. जिल्हा बँकेच्या कर्जाची एकीकडे वसुली होत नसताना, ठेवीदार मात्र ठेवी परत मिळविण्यासाठी तगादा लावत आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेच्या प्रशासकाने आता जिल्ह्यातील बड्या ७०० थकबाकीदारांची यादी तयार केली असून, त्यातील प्रमुख शंभर जणांची यादी प्रसिद्ध केली आहे. पाठोपाठ बिगरशेती संस्थांकडेही बँकेने मोर्चा वळवला आहे. याच कारवाईअंतर्गत मालेगावच्या द्याने येथील माजी मंत्री प्रशांत हिरे यांच्याशी संबंधित रेणुकादेवी औद्योगिक सहकारी संस्थेची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. या मालमत्तेची लिलावाद्वारे विक्रीसाठी निविदा काढण्यात आली आहे. त्यानुसार निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख ५ जानेवारी असून ६ तारखेला निविदा उघडल्या जाणार असल्याचे बँकेकडून सांगण्यात येत आहे.

# कुटुंब न्यायालयात वेळकाढूपणा

✔ सुराज्य/मुंबई

**राज्याची वाढती लोकसंख्या व घटस्फोटांचे वाढते प्रमाण लक्षात घेता राज्यभरात अधिक कुटुंब न्यायालयांची गरज असताना राज्य सरकारकडून त्याविषयी निर्णय घेऊन आणखी न्यायालये स्थापन करण्याबाबत वेळकाढूपणा होत आहे, अशी नाराजी मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच व्यक्त केली. तसेच विविध जिल्ह्यांत कुटुंब न्यायालयांची स्थापना करण्याच्या प्रस्तावांविषयी किती प्रगती झाली, याबाबतचा अहवाल १२ जानेवारीला मागितला आहे.**

## उच्च न्यायालयाने व्यक्त केली नाराजी



## १२ जानेवारीला मागितला प्रगती अहवाल

'अखेरीस राज्य सरकारने पायाभूत व्यवस्था पुरवावी. त्यानंतर त्याठिकाणी कुटुंब न्यायालये सुरू होतील हे उच्च न्यायालय पाहील. सरकारने ठोस पावले उचलायला हवीत', असे खंडपीठाने नमूद केले. तसेच विचाराधीन प्रस्तावांवरील प्रगती दाखवा, असे सांगत १२ जानेवारीला पुढील सुनावणी ठेवली.

व्यावसायिक तुषार गुप्ता यांनी ॲड. मीनाझ ककालिया यांच्यामार्फत याप्रश्नी जनहित याचिका केली आहे. १९८४च्या कुटुंब न्यायालय कायद्यातील कलम ३ अन्वये असलेल्या तरतुदीप्रमाणे दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक भागात राज्य सरकारने उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करत कुटुंब न्यायालय स्थापन करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात तसे झालेले नाही. मुंबईचेच उदाहरण घेतले तर लोकसंख्येच्या तुलनेत न्यायालये नसल्याने प्रलंबित प्रकरणांची संख्या खूप मोठी आहे.

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, २०११च्या जनगणनेप्रमाणे राज्याची लोकसंख्या ११ कोटी २४ लाख असताना त्याअनुषंगाने राज्यभरात ३९ कुटुंब न्यायालये आवश्यक होते. परंतु, प्रत्यक्षात राज्यभरात केवळ १९ कुटुंब न्यायालये आहेत. राज्य सरकारने या समस्येचा साकल्याने आढावाच घेतलेला नाही', असे याचिकाकर्त्याने मागील वर्षी केलेल्या या याचिकेत निदर्शनास आणले आहे.

हा प्रश्न उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून मार्गी लावणे आवश्यक असल्याने याचिकेत उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांना प्रतिवादी करायला हवे. तसेच कुटुंब न्यायालयांसाठी किती जागा आवश्यक असेल हे कळायला हवे.

राज्यभरात आणखी कुटुंब न्यायालये स्थापन करण्याचे प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्यात विधी विभागाकडून प्राथमिक छाननी आणि त्यानंतर अर्थ विभागाची छाननी व मंजुरी तसेच अन्य विभागांकडून तपासणी व मंजुरी अशा प्रक्रियेचाही समावेश आहे', असे म्हणणे सरकारी वकिलांनी नुकत्याच झालेल्या सुनावणीत मांडले.

जमीन उपलब्ध आहे की नाही, असे न्यायालयाने विचारावे आणि नंतर सरकारने पावले उचलावीत, अशी अपेक्षा आहे का?', असा प्रश्न प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापुरवाला व न्या. संतोष चपळगावकर यांच्या खंडपीठाने उपस्थित केला. तसेच जेव्हा ठोस पावले उचलायची नसतात, तेव्हा मूळ प्रश्नाची गांभीर्याने सोडवणूक करण्याऐवजी विविध विभागांत फायली फिरवत वेळकाढूपणा केला जातो', अशी नाराजीही खंडपीठाने व्यक्त केली.

# धडकी भरवणारी सीमा भागातील मराठी भाषिकांची रॅली

## ठाकरे गटासह शिंदे गटही सहभागी

✔ सुराज्य/कोल्हापूर

**महाराष्ट्र एकीकरण समितीने सोमवारी कोल्हापूरमध्ये येऊन धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतल्याने सकाळपासूनच कोगनोळी टोलनाक्यावर कर्नाटक प्रशासनाने कडक पोलीस बंदोबस्त ठेवला होता. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या धरणे आंदोलनात महाविकास आघाडीसह, भाजप, शिंदे गटही सहभागी झाले होते. यावेळी महाराष्ट्र एकीकरण समितीकडून एक दिवस महाराष्ट्र बंद ठेऊन महाराष्ट्र आमच्या पाठीशी असल्याचे दाखवून द्या, अशीही मागणी करण्यात आली.**



महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे आणि याची धग सीमा भागातील मराठी भाषिकांना बसते आहे. यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीकडून गेली अनेक वर्षे लढा दिला जात आहे. गेल्या १९ तारखेला बेळगावमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीकडून मेळावा घेण्यात येणार होता. मात्र, या मेळाव्याला कर्नाटक सरकारने परवानगी नाकारत सदर मेळावा मोडीत काढला. तसेच महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेत डांबून ठेवण्यात आले. मराठी भाषिकांवर होत असलेल्या सातत्याने अन्याया विरोधात महाराष्ट्र एकीकरण समितीने कोल्हापुरात धरणे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र एकीकरण समितीचे तब्बल अडीच ते तीन हजार कार्यकर्ते आणि मराठी भाषिक बेळगावमधून कोल्हापूरच्या दिशेने सोमवारी सकाळी रवाना झाले.

यावेळी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील कोगनोळी टोल नाका येथे कर्नाटक सरकारकडून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच प्रत्येक गाडीची चौकशी करण्यात येत होती. याचवेळी महाराष्ट्र एकीकरण समितीचे नेते महाराष्ट्रात दाखल होताच महाविकास आघाडीच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. 'महाराष्ट्र मे नहीं, तो जेल में' अशा घोषणा देत महाराष्ट्र एकीकरण समिती व महाविकास आघाडीच्या नेते कोल्हापूर शहराच्या दिशेने रवाना झाले. धडकी भरवणारी गर्दी आणि जोरदार घोषणा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा तसेच रस्त्याच्या बाजूस असलेल्या इमारतींमधून लोक वाकून बघत होते.

# खरा शिवसैनिक आजही उद्धव यांच्याच पाठीशी : अंधारे

## मोहोळ येथे ठाकरे गटाची महाप्रबोधन यात्रेनिमित्त सभा

सुराज्य/सोलापूर

**खोटे आरोप करून ४० लोकांनी गद्दारी केली. जे लोक भाजपा वर विश्वास ठेवून गेलेत, त्या शिंदे भाऊंचा सुद्धा देवेंद्रभाऊ गेम करणारच, हे लोक केवळ सत्तेच्या लालचेपोटी आणि केंद्रातील ईडी, सीबीआय सारख्या संस्थांच्या कारवाईला घाबरून गेले आहेत. हे चाळीस गेले म्हणून शिवसेना संपत नसते, खरा शिवसैनिक हा आजही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याच पाठीशी असल्याचे शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सांगितले.**

मोहोळ येथे शिवसेना (ठाकरे) यांच्या वतीने मोहोळ नगर परिषदेसमोर महाप्रबोधन यात्रेनिमित्त सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी शिवसेना उपनेत्या व सोलापूर जिल्हा महिला संपर्क प्रमुख संजना घाडी, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ, शिवसेना जिल्हा प्रमुख गणेश वानकर, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटक आणि मोहोळच्या माजी नगरसेविका सीमा पाटील, सोलापूर लोकसभा समन्वयक दीपक गायकवाड, शिवसेना तालुका समन्वयक काकासाहेब देशमुख, प.स माजी उपसभापती बाळासाहेब गायकवाड, शिवसेना उपजिल्हा प्रमुख दादासाहेब पवार शिवसेना उत्तर सोलापूर उपजिल्हाप्रमुख विक्रांत काकडे, शिवसेना मोहोळ तालुका प्रमुख अशोक भोसले शिवसेना बार्शी तालुका प्रमुख प्रवीण काकडे, शिवसेना उत्तर सोलापूर तालुका प्रमुख संजय पौळ, युवासेना राज्य विस्तारक शरद कोळी, युवासेना जिल्हा प्रमुख महेश देशमुख शिवसेना मोहोळ शहर प्रमुख विकी देशमुख, युवती सेना जिल्हा प्रमुख आयोध्या पोळ, प्रा अजय दासरी बाळासाहेब वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संजना घाडी अनिल कोकीळ दीपक गायकवाड दादासाहेब पवार महेश देशमुख, विक्रम देशमुख, काका देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. अंधारे म्हणाल्या की, शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कुटुंबप्रमुख म्हणून सर्व जबाबदाऱ्या अत्यंत काळजीने पार पाडल्या. स्वतः मुख्यमंत्री असताना नगरविकास खाते एकनाथ शिंदे यांना दिले असे असताना उद्धव ठाकरे भेटत नाहीत, त्यांच्याकडून निधी मिळाला नाही.राष्ट्रवादी बरोबर गेल्याने शिवसेना संपत आहे.असे खोटे आरोप करून ४० लोक बाहेर पडले, जनता त्यांना योग्यवेळी धडा शिकवेल.

### मोदीजी जे बुरे दिन होते तेच हवे आहेत

मोदीजी अदानी अंबानी यांचे भल करणारे अच्छे दिन आम्हाला नको आहेत,तुम्ही पंतप्रधान होण्यापूर्वी जे बुरे दिन होते तेच हवे आहेत असे म्हणत वाढती महागाई बेरोजगारी यावर शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जोरदार प्रहार केला.

### मोहोळमध्ये देशमुख अँड सन्स कंपनीच दिसते

या स्टेजवर असणाऱ्या प्रमुख मन्यवरांची नावे घेत असताना देशमुख देशमुख अशी यादीत नावे जास्त दिसली. त्यावेळी अंधारे यांनी देशमुख अँड सन्स कंपनीच दिसतेय असे म्हणाल्या अन् श्रोत्यात हशा पिकला.




# भेळ चांगली नसल्याच्या कारणावरून विक्रेत्सास मारहाण

**सोलापूर** : भेळ चांगली नसल्याच्या कारणावरून भेळ विक्रेत्यास मारहाण केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२५ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास राजेश पायलट चौक जुना विडी घरकुल येथे घडली.याप्रकरणी विजय किशोर जाटव (वय-४०,रा.भारत नगर,जुना विडी घरकुल,हैदराबाद रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आकाश कुंभार व त्याच्यासोबत असलेले अनोळखी सहा साथीदारांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. विजय आणि आणि त्यांचा पुतण्या अभिषेक जाटव असे दोघे मिळून भेळ विक्रीच्या हातगाडीवर भेळ विक्री करतात. वरील संशयित आरोपी यांनी त्यावेळी भेळ चांगली दिल्या नसल्याच्या कारणावरून हाताने केली. तपास पो. हे.कॉ. चव्हाण हे करीत आहेत.

# ट्रॅक्टरची दुचाकीला धडक; चालकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : ट्रॅक्टर चालकाने अतिवेगाने व बेकायदेशीरपणे ट्रॅक्टर चालवून एका दुचाकीला धडक देऊन दुचाकीचे नुकसान केल्याची घटना दि.२५ डिसेंबर रोजी रात्री सव्वानऊ वाजण्याच्या दरम्यान महावीर चौक येथे घडली. याप्रकरणी योगेश महालिंग सोनवणे (वय-२४,रा.भाग्यश्री पार्क, विमानतळ) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.२२.ए.एम.४६०४ या क्रमांकाच्या चालका विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वरील ट्रॅक्टर क्रमांकाच्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर अतिवेगाने व बेकायदेशीरपणे चालवून फिर्यादी यांच्या मोटारसायकल क्र.एम.एच.१३.सीझेड.५५५१ ला धडक देऊन २५ हजार रुपयाचे नुकसान करत फिर्यादी यांना जखमी करून ट्रॅक्टर चालक पळून गेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास मपोना गवसाने या करीत आहेत.

# व्यापाऱ्याचे घर फोडून चोरट्याने रक्कम पळवली

**सोलापूर** : सहकुटुंब गावी गेल्यावर अज्ञात चोरट्याने घर फोडून एक लाख पस्तीस हजार रुपयांची रक्कम चोरून नेल्याची घटना दि.२४ ते २५ डिसेंबर दरम्यान गुरु राघवेंद्र नगर मुळेगाव रोड येथे घडली. याप्रकरणी दाऊद इस्माईल अत्तार (वय-३०,रा. गुरु राघवेंद्र नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दाऊद आणि त्यांचा भाऊ समीर यांच्या मुलाच्या कार्यक्रमासाठी कर्नाटक येथे सहकुटुंब गेले होते.त्यावेळी चोरट्याने फिर्यादी यांच्या पाठीमागील दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत १ लाख ३५ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी हे करीत आहेत.

# जातीवाचक शिवीगाळ; कुरुलच्या तिघांची मुक्तता

**सोलापूर** : महिलेस जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणातील सुहास श्रीमंत पवार त्याचा भाऊ गोपीनाथ पवार आणि सुंदर पांडुरंग शिंदे( सर्व रा. कुरुल ता. मोहोळ) यांना गुन्हा शाबित न झाल्यामुळे निर्दोष मुक्त करण्याचा आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश के.डी.शिरभाते यांनी नुकताच दिला. १२ आक्टोबर २०१३ रोजी फिर्यादी महिला या घरामध्ये पूजा पाठ करीत होत्या. त्यावेळी आरोपी सुहास पवार याने त्यांच्या घराकडे वाकून पाहिले होते. त्यावर त्यांनी असे का पाहतो म्हणल्यावर तो शेतात निघून गेला होता. त्यानंतर फिर्यादी या गावातून जात असताना आरोपींनी त्यांना मारहाण आणि जातीवाचक शिवीगाळ केली.असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. या खटल्यात आरोपीतर्फे ॲड.मिलिंद थोबडे, ॲड.विनोद सूर्यवंशी,ऍड.दत्ता गुंड, ऍड.निशांत लोंढे, ॲड. अमित सावळगी यांनी तर सरकारतर्फे ॲड. दत्तूसिंग पवार यांनी काम पाहिले.




# जखमी दुचाकी चालकाचा मृत्यू

हैदराबाद रोडवरील मोतीवाला फंक्शन हॉल जवळ चार चाकी वाहनाच्या धडकेने जखमी झालेले एजाज मेहबूब शेख (वय ३७ रा.बोरामणी ता.दक्षिण सोलापूर) हे शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी पहाटे मरण पावले. ते १९ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास मार्केट यार्ड ते बोरामणी असा दुचाकीवरून प्रवास करीत होते. त्यावेळी चार चाकी वाहनाच्या धडकेने जखमी झाले होते. अशी नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

# सहारा हॉटेल समोरून दुचाकी पळवली

अज्ञात चोरट्याने दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सीआर.८५५४ ही हैदराबाद रोडवरील सहारा हॉटेल समोर पार्क करून ठेवली होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने ही दुचाकी हॅण्डल लॉक तोडून डुप्लिकेट चवीचा वापर करत चोरून नेली आहे. ही घटना दि.२५ डिसेंबर रोजी घडली.याप्रकरणी सुधीर सुभाष सोनकर (वय-३४,रा. मड्डी वस्ती,धनगर गल्ली) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाकडे एक लाख डोसची मागणी

**सोलापूर** : कोरोनाचा नवा बीएफ ७ व्हेरिएंट चा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता गृहीत धरून राज्यभरात काळजी घेतली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने राज्य शासनाकडे एक लाख डोस ची मागणी केली आहे. महाराष्ट्रासह राजस्थान, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, तेलंगणा, पश्चिम बंगाल या राज्यात कोरोनाच्या प्रादुर्भावात किंचित वाढ झाली आहे.




कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाचा धोका लक्षात घेऊन प्रशासनाकडून अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. सध्या जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे कोव्हॅक्सिनचे २२ हजार डोस शिल्लक आहेत. कोरोना वाढू नये यासाठी काळजी म्हणून एक लाख डोस मागविण्यात आले आहेत. यात ५० हजार कोविशिल्ड तर ५० हजार कोव्हॅक्सिनचे डोसचा समावेश आहे. एका बाटलीतून १० लोकांना लस देता येते. मात्र, कुणाला चुकून कमी डोस मिळू नये, यासाठी लस उत्पादक कंपनी प्रत्येक बाटलीत ५ मिलीपेक्षा थोडी जास्त लस देत असते. प्रत्येक बाटलीत अर्धा मिलीच्या जवळपास जास्त डोस असतो. जवळपास सर्व प्राथमिक केंद्रावर प्रिकॉशनरी डोसही दिला जात आहे.

### जि.प.आरोग्य विभागाचा लसीकरणावर भर

फक्त आरोग्य केंद्रच नव्हे तर घरोघरी, वस्ती, शेती, कारखाने आदी ठिकाणी जाऊन आरोग्य कर्मचारी लस देत आहेत. नव्या व्हेरिएंटच्या प्रादुर्भाव होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली तरी नागरिकांकडून लस घेण्यास चांगला प्रतिसाद मिळत नाही. तरीही लसींचा मुबलक साठा तयार ठेवण्यात येत असून अधिकाधिक लसीकरण करण्यात येत असल्याचे जिल्हा आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

# दूध उत्पादनाचा खर्च वाढला; पशूखाद्याच्या किंमतीने मागील ९ वर्षांचा विक्रम मोडला

## चाऱ्याच्या दरात ही मोठी वाढ; पशुपालक चिंतेत

**सोलापूर** : दुधाच्या उत्पादन खर्चात यावर्षी मोठी वाढ झाली आहे. दुधाळ जनावरांच्या चाऱ्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. चाऱ्याचे दर हे मागील ९ वर्षातील उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. यावर्षी ऑगस्टमध्येच पशुखाद्याच्या महागाईनं मागच्या ९ वर्षांचा विक्रम मोडला आहे. ऑगस्टमध्ये या किंमती २५.५४ टक्क्यांनी वाढल्या होत्या. परंतू नोव्हेंबरपर्यंत हा आकडा वाढला आहे.

सध्या चाऱ्याच्या किंमतीत ही वाढ झाली आहे.जनावरांच्या चाऱ्याच्या दरात सातत्यानं वाढ होत असल्यानं दुग्ध व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांचा उत्पादन खर्च वाढला आहे. या वाढत्या खर्चामुळे पशुपालन करणारे शेतकरी चिंतेत आहेत. पशुखाद्य वा चाऱ्याच्या किंमती कमी करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी पशुपालकातून होत आहे. चांगल्या दुग्धोत्पादनासाठी जनावरांना चारा दिला जातो. जनावरांच्या आरोग्यासाठीही ते आवश्यक आहे. मात्र, गेल्या काही महिन्यातील वाढत्या महागाईमुळं पशुपालकांची चिंता वाढली आहे. द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं घाऊक किंमत निर्देशांकी आकडेवारी जाहीर केली आहे. यामध्ये नोव्हेंबरमध्ये पशुखाद्याचे निर्देशांक मूल्य २२५.७ नोंदवले गेले आहे. मागील वर्षी हेच निर्देशांक मूल्य १७६.८ नोंदवले गेले होते.

आकडेवारीनुसार वर्षभरात चाऱ्याची किंमतीत २८ टक्क्यांची वाढली आहे. डिसेंबर २०२१ पासून पशुखाद्य आणि धान्याच्या किंमती वाढत आहेत. गेल्या १० महिन्यांपासून या किंमती सातत्यानं वाढत आहेत.

### चारा-उन्मुख एफपीओ तयार करण्यास मान्यता

चाऱ्याच्या तुटवड्यामुळं दरात थोडी वाढ झाली आहे. यावर उपाय म्हणून, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाला चारा प्लस मॉडेल अंतर्गत १०० चारा-उन्मुख एफपीओ तयार करण्यास मान्यता दिली आहे .जर असेच दर वाढत राहिले तर शेतकऱ्यांचे गाय गोठे मोडकळीस येतील अशी भिती व्यक्त केली जात आहे.



# वळसंग विहिरीच्या सुशोभिकरणाला ७० लाख मंजूर

**सोलापूर** : वळसंग येथील ऐतिहासिक विहिरीच्या दुसरा टप्प्याचे सुशोभीकरणाचे काम या ठिकाणी हाती घेण्यात आले आहे. याला जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ७० लाख रुपये निधी प्राप्त झाला आहे.

जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली प्रशासकीय मान्यता दिली आहे. माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला होता, त्याला यश आले आहे. वळसंगमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३७ साली सर्व नागरिकांनी व भीमसैनिकांनी ऐतिहासिक विहीर बांधली. ते विहीर भीमनगर मधील सर्व समाज बांधवांनी लोकवर्गणीतून गोळा करून बांधली.

डॉ.आंबेडकर यांच्या हस्ते विहिरीचे उद्‌घाटन करण्यात आले. त्या ऐतिहासिक विहिरीचा दुसरा टप्प्याचा सुशोभीकरणाचे काम या ठिकाणी हाती घेण्यात आले आहे डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून ७० लाख रुपये निधी प्राप्त झाला आहे. याला पालकमंत्री विखे-पाटील व माजी पालकमंत्री भरणे, आ.सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, सोलापूर जिल्हा परिषदचे सी.ई.ओ. स्वामी या सर्व अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळालेला आहे. यांच्याकडे चंदनशिवे यांनी निवेदन वेळोवेळी पाठपुराव केला होता.

# केंद्रीयमंत्री आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून साजरा

सुराज्य/वेळापूर



वेळापूर(ता माळशिरस) येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष डॉ रामदास आठवले यांचा वाढदिवस संघर्षदिन म्हणून साजरा करण्यात आला. रिपाइं प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय शाळा मुले येथे विद्यार्थांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

अध्यक्षस्थानी वेळापूर गावचे नूतन सरपंच रजनीश बनसोडे होते.यावेळी रिपाइं आठवले माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, रायचंद खाडे, वेळापूर शहराध्यक्ष शरद साबळे, बॉबी वाघमारे, गणेश साठे, मुख्याध्यापक रमेश वाघमारे, सुभाष गायकवाड, एम एच साबळे, महादेव घोगरे, संतोष खरे, अजित साठे, दिपक आयरे, जयसिंग साठे, राहुल नाईकनवरे, नितीन साठे, अतुल साठे, राहुल दणाने, अभिजीत साठे, सुनील साठे, ओंकार सरतापे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका व वेळापूर शहर यांच्या वतीने करण्यात आलं होत.याप्रसंगी मिलिंद सरतापे, रजनीश बनसोडे, मुख्याध्यापक रमेश वाघमारे आदींनी मनोगत व्यक्त केले.

# नववर्षाच्या स्वागतासाठी सोलापुरात सायक्लोथॉन

**सोलापूर** : माझी वसुंधरा अभियान ३.० व राष्ट्रीय स्वच्छ वायु उपक्रम अंतर्गत सोलापूर महानगरपालिका पर्यावरण विभाग व रॉयल रायडर्स ग्रुप, सोलापूर यांच्यावतीने नवीन वर्षाच्या स्वागतासाठी १ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ५:४५ वाजता सोलापूर सायक्लोथॉन २०२३ या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. १ जानेवारी रोजी सकाळी पावणे सहा वाजता नॉर्थकोर्ट मैदान येथून सायक्लोथॉनला सुरुवात होईल. लहानांसाठी ७ किलोमीटर आणि मोठ्यांसाठी १२ किलोमीटर सायकलिंग असेल. शहराच्या विविध भागातून सायकलिंग करून समारोप नॉर्थकोर्ट मैदान येथेच होणार आहे.

# एकदा होऊन जाऊ द्या समोरासमोरची लढाई : धोत्रे

**पंढरपूर** : एकदा समोर समोरची लढाई होऊन जाऊ द्या. रडीचा डाव खेळू नका, असे आव्हान मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी पंढरपूर अर्बन बँकेच्या सत्ताधाऱ्यांना केले.

पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची निवडणूक जाहीर झाली आहे. यासाठी मंगळवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सर्वच्या सर्व जागांवर उमेदवारी अर्ज दाखल केले. याला आवाहन अर्बन बँक बचाव समविचारी पॅनलच्या वतीने देण्यात आले आहे. याबाबत मंगळवारी समविचारी पॅनलचे प्रमुख मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले,अरुण कोळी, सुधीर धोत्रे, लखन चौगुले, संजय बंदपट्टे, शशिकांत पाटील यांच्यासह समविचारी पॅनलचे उमेदवार उपस्थित होते.

आमच्या उमेदवारांवर सत्ताधारी गटाकडून दबाव टाकला जात आहे. आमच्या सर्वच उमेदवारांनी सर्व अटी पूर्ण करून अर्ज दाखल केले आहेत. मात्र आमचे उमेदवारी अर्ज बाद करण्याची शक्यता सत्ताधारी मंडळींकडून होत असल्याचा आरोप यावेळी धोत्रे यांनी केला आहे.

# पाच टक्के दंड आकारून विविध कामांना मुदतवाढ; रस्त्यांसह विविध २३ कामांचा समावेश




सुराज्य/सोलापूर

मक्ता रकमेच्या पाच टक्के दंड आकारून २३ विविध विकास कामांना मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी दिली.

रस्त्यासह इतर विकास कामांची मुदत संपत आली होती. काम पूर्ण न झाल्याने अखेर ही कामे मार्गी लावावी या उद्देशातून मक्त्याच्या ५ टक्के दंड आकारून संबंधित मक्तेदारांना या कामांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. साधारणतः तीन - पाच लाखांची विकास कामे आहेत. ज्या कामांचे साईट प्रॉब्लेम आहेत. त्यांची वर्क ऑर्डर न करण्याचे आदेश ही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. गेल्या काही वर्षांपासून सोलापूर शहरात गेल्या काही वर्षापासून पावसाळा व इतर कारणास्तव अंतर्गत रस्ते व इतर कामे रखडली होती. या कामाची मुदत संपत आली होती.

ही कामे मार्गी लावावी यासाठी अशा कामांना मुदतवाढ देण्याचा अखेर निर्णय आयुक्तांनी घेतला आहे.

### परिवहन कर्मचाऱ्यांना देय रकमांचे आज वाटप

महापालिका परिवहन उपक्रमाकडे पोलीस अनुदानापोटी सुमारे तीन कोटीची रक्कम शासनाकडून प्राप्त झाली आहे. या रकमेतून परिवहनच्या निवृत्त व कार्यरत कर्मचाऱ्यांना देय रकमांचे वाटप बुधवार दिनांक २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली. हे पोलिस अनुदान मिळण्याकरिता पोलीस आयुक्तांचे मोठे सहकार्य लाभले. त्याचबरोबर महापालिकेच्या उपायुक्त विद्या पोळ व मुख्य लेखापाल रूपाली कोळी यांनीही सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता, असेही आयुक्तांनी यावेळी सांगितले.




# आ.सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांना यश; दक्षिण हद्दवाढ भागातील कामांना १० कोटी मंजूर

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर मतदारसंघातील हद्दवाढ भागातील आ. सुभाष देशमुख यांनी सूचवलेल्या कामांना महापालिका क्षेत्रात मुलभूत सोईसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेंतर्गत १० कोटींचा निधी नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मंजूर केला आहे.

प्रशासक काळात हा निधी कामाच्या नावाच्या यादीनुसार मंजूर करण्यात आल्याने विकासकामांना गती येणार आहे. सध्या महापालिकेवर प्रशासकराज आहे. याच दरम्यान आ. सुभाष देशमुख यांनी दक्षिण मतदारसंघातील हद्दवाढ भागातील विविध कामांसाठी आयुक्त तथा प्रशासकाकडे निधी मागितला होता. आयुक्तांनी हा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. आ. सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. नागपूर अधिवेशात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आद्यक्रमाने या कामांसाठी १० कोटींचा निधी मंजूर केला आहे. विशेष म्हणजे आ. देशमुख यांनी हा निधी कामाच्या नावाच्या यादीनुसार मंजूर केल्याने इतरत्र हा निधी पळवला जाणार नाही, याची खबरदारी घेतली आहे. या निधीमुळे हद्दवाढ भागातील विकासकामांना गती येणार आहे. दक्षिण मतदारसंघात येणाऱ्या हद्दवाढ भागात प्रभाग १९ ते २६ मधील ११७ कामांसाठी आ. देशमुख यांनी १० कोटींचा निधी खेचून आणला आहे.



यामध्ये पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, रस्ते करणे, ड्रेनेज करणे, फरशीकरण करणे, तारेचे कंपौंड टाकणे, पोल टाकणे, पथदिव्यांसाठी तार टाकणे, स्विच बोर्ड बसवणे आदी कामांचा समावेश आहे. आगामी काळात निवडणुका होत आहेत, त्या पार्श्वभूमीवर हा निधी मंजूर करून आणल्याने दक्षिणमधील नगरसेवकांनी देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

### हद्दवाढच्या विकासासाठी प्रयत्न सुरूच राहणार

दक्षिणमधील हद्दवाभागातील विविध कामांसाठी शानसाकडून १० कोटी रूपये नव्याने मंजूर झाले आहेत. लवकरच या कामांचे अंदाजपत्रक तयार करून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या कामांना सुरुवात केली जाईल. हद्दवाढ भागाच्या विकासाच्या दृष्टीने आपले प्रयत्न यापुढेही कायम राहतील, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

### भाजपच्या नगरसेवकांना दिलासा : काळे

आ. सुभाष देशमुख यांनी सर्व समावेश कामे मंजूर करून घेतली आहेत. प्रशासक काळात ही कामे मंजूर झाल्याने भाजपच्या नगरसेवकांना चांगला दिलासा मिळाला आहे. याचा लाभ महापालिका निवडणुकीत निश्चित होणार आहे, असे सांगत माजी उपमहापौर राजेश काळे यांनी हा निधी मंजूर करून आणल्याबद्दल आ. देशमुख यांचे आभार मानले आहेत.